# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०२ मार्च, २०२१ / फाल्गुन ११, १९४२ (शके)**

**(१) गृह मंत्री**
**(२) महसूल मंत्री**
**(३) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री**
**(४) कृषी, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**
**(५) रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री**
**(६) वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६०**

---

### ठाणे जिल्ह्यातील हुक्का पार्लरवर कारवाई करण्याबाबत

**(१) * ६७६७ श्री.रविंद्र फाटक, श्री.महादेव जानकर, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे (जि.ठाणे) परिसरात मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग अंमली पदार्थांच्या आहारी गेल्याचे निदर्शनास आल्याने दोन वेगवेगळया हुक्का पार्लरवर गुन्हे अन्वेषण विभागाच्या युनिट एक तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने छापे टाकल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंमली पदार्थ विक्री करणारे जाळे अंमली पदार्थांसह वागळे युनिटने माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान पकडले असून गुन्हे अन्वेषण विभागाने टाकलेल्या छाप्यात किती आरोपीना अटक करण्यात आले आहे, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठाणे जिल्ह्यात अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख** : (१) ठाणे पोलीस आयुक्तालयातील गुन्हे अन्वेषण विभागातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाकडून माहे डिसेंबर, २०२० मध्ये एका हुक्का पार्लरवर कारवाई करण्यात आली आहे.

(२) व (३) ठाणे पोलीस आयुक्तालयातील गुन्हे अन्वेषण विभागातील गुन्हे शोध पथक-५ वागळे घटकामधील अधिकारी यांनी माहे डिसेंबर, २०२० मध्ये एक तसेच जानेवारी, २०२१ मध्ये एक अशा एकूण दोन कारवाया खालीलप्रमाणे केल्या आहेत.

i) वागळे इस्टेट ठाणे परिसरातील आनंदनगर जकातनाका सार्वजनिक शौचालयाचे बाजूला उघड्यावर ३ आरोपीतांनी ५५ ग्रॅम एम.डी. (मेफेड्रॉन) या अंमली पदार्थ कब्जात बाळगल्यावरुन त्यांना अटक करुन आरोपीतांविरुध्द कोपरी पोलीस स्टेशन गु.र.नं. ११३/२०२० अंमली पदार्थ विरोधी कायदा, १९८५ कलम ८(क), २२(क), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करुन कारवाई केली आहे. सदर प्रकरणी आरोपी सध्या जेलमध्ये आहेत.

ii) वागळे इस्टेट ठाणे परिसरातील दर्यासागर हॉटेल भागात रोडवर ३ आरोपीतांनी कब्जात ४.०५ लाख रुपये किंमतीचा चरस हा अंमली पदार्थ बाळगले प्रकरणी पकडून त्यांचेविरुध्द वागळे इस्टेट पोलीस स्टेशन, गु.र.नं. २९/२०२१ अंमली पदार्थ विरोधी कायदा, १९८५ चे कलम ८(क), २०(ब) प्रमाणे दिनांक २६/०१/२०२१ रोजी गुन्हा नोंद करुन कारवाई केली आहे. सदर प्रकरणी आरोपीतांना दिनांक २२/०२/२०२१ पर्यंत न्यायालयीन कोठडी बजावण्यात आली आहे.

अंमली पदार्थाच्या खरेदी विक्री व साठवणूक विरुध्द कारवाई करणेकरीता ठाणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये अंमली पदार्थ विरोधी पथक हे गुन्हे शाखेंतर्गत कार्यरत आहे. सदर घटकामध्ये ०४ अधिकारी व १५ अंमलदार कर्तव्यावर आहेत. सदर घटकाकडून संपूर्ण ठाणे शहरात अंमली

पदार्थ विरोधी कारवाई करण्यात येत आहे. तसेच गुन्हे शाखेचे इतर घटक व सर्व पोलीस स्टेशनस्तरावर देखील अंमली पदार्थ विरोधी कारवाई करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत.

अंमली पदार्थ विरोधी पथक या घटकाकडून लोकांनी अंमली पदार्थाच्या सेवनाविरुध्द परावृत्त व्हावे म्हणून जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यामध्ये अंमली पदार्थाचे दुष्परिणाम दर्शविणारे भिंत्ती पत्रके, स्टिकर्स, बॅनर यांचे प्रदर्शन करण्यात येते. एसएमएसव्दारे संदेश प्रसारीत करण्यात येतात. शॉर्ट फिल्म/सांस्कृतिक कार्यक्रमाव्दारे ही जनजागृती करण्यात येते.

अंमली पदार्थ विरोधी या घटकाकडून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणेकरीता अंमली पदार्थ सेवनाने होणारे दुष्परिणाम दर्शविणारे निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, भाषण स्पर्धा पथनाट्य इ. कार्यक्रम साजरे करुन विद्यार्थ्यामध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी योजनेस निधी देण्याबाबत

**(२) * ६४३८ श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड-१९ च्या कालावधीत शासनाने कृषी विकासाच्या चार योजनांवरील निधीत रुपये २४९ कोटी १४ लाख ४४ हजारांची कपात केल्याने ठाणे व पालघरसह संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली असून या निर्णयामुळे एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या निधीत कपात करण्यात आली आहे, केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या ६० टक्के अनुदानामुळे सन २०१५ पासून हे अभियान राबविण्यात येत असून या अंतर्गत शेतकऱ्यांना फळे, भाजीपाला, नारळ, काजू, सुगंधी वनस्पती पिकविण्यासाठी अनुदान देण्यात येते, सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात यासाठी रुपये १९६ कोटी ५८ लाख १० हजाराची अर्थसंकल्पीय तरतूद केली होती, मात्र यापैकी ३३ टक्के

निधीस मान्यता दिल्याने ही रक्कम रुपये ६४ कोटी ८७ लाख १७ हजार असून यामध्ये रुपये १३१ कोटी ७० लाख ९३ हजाराची कपात करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी कपातीमुळे डॉ.पंजाबराव देशमुख जैविक व विषयुक्त शेती अभियानासाठी रुपये २० कोटी ७५ लाख ९७ हजाराच्या तरतूदीपैकी केवळ १० टक्के निधीस मान्यता मिळाल्याने रुपये २ कोटी ७ लाख ५९ हजाराचा निधी मंजूर करुन रुपये १८ कोटी ६८ लाख ३८ हजाराची कपात करण्यात आली आहे, तर राज्याचे माजी कृषी मंत्री भाऊसाहेब फुंडकर यांच्या नावाने सुरु असलेल्या फळबाग लागवड योजनेसाठीच्या रुपये १०० कोटी अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी २० टक्के म्हणजे केवळ रुपये २० कोटी वितरित केलेले असल्याने राज्यातील फळबाग लागवड, बागायतदारांनी नाराजी व्यक्त केली असून शेतकऱ्यांची आर्थिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, राज्यात कोरोनाचे संकट सर्वात जास्त शेतकऱ्यांवर असून शासनाच्या निधी कपातीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण वाढत असल्याने शासनाने कर्जामाफीसह सर्वच कृषी योजनांचा निधी वाढविण्याची मागणी शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील कृषी योजनांचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय, दिनांक २७/१०/२०२० अन्वये सन २०२०-२०२१ मध्ये राज्यात कृषी उन्नती योजना - एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान राबविण्यासाठी रुपये १०८.७९ कोटी निधीच्या कार्यक्रमास सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही. डॉ.पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनकरीता सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाकरीता रुपये २०.७५ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर असून रुपये २.१७ कोटी वितरित करण्यात आले आहेत. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेकरीता सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षासाठीच्या रुपये १११ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर असून रुपये ४२.२० कोटी वितरित करण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) कोविड-१९ जागतिक महामारीमुळे झालेल्या लॉकडाऊनमुळे उद्‌भवलेल्या विपरीत परिस्थितीतही कृषी विकासाच्या योजनांच्या अर्थसंकल्पीय तरतूदीच्या मर्यादेत टप्प्याटप्प्याने निधी वितरण करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: विदर्भातील कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३) * ६४५३ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुरेश धस, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः नागपूर, अमरावती, औंरगाबाद, लातूर, पूणे, कोल्हापूर, नाशिक व ठाणे या कृषी विभागात २७४५३ मंजूर पदांपैकी ८६६३ पदे रिक्त असून लिपिक संवर्गातील ३१२१ मंजूर पदांपैकी १२८० पदे रिक्त असल्याचे तसेच वर्ग-२ तांत्रिक अधिकाऱ्यांची पदे नामनिर्देशनाने भरलेली नसणे, पदोन्नतीची प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भात रिक्त पदांमुळे कृषी अधिकाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असून कृषी विभागात पन्नास टक्क्यापेक्षा अधिक पदे रिक्त असल्याने कृषी विभागाच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यास अडचणी येत असून कामे संथगतीने होत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिकाऱ्यांच्या भावी आत्मा योजनेची साखळी पूर्णपणे विस्कळीत झाली असून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प पूर्णपणे ठप्प झाला असल्याची खंत माजी कृषी मंत्री यांनी व्यक्त केली असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडे निवेदन देवूनही तसेच मा.कृषी मंत्री यांच्यासोबत झालेल्या संघटनेच्या बैठकीत आश्वासन देवूनही रिक्त पदे भरण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील विशेषत: विदर्भातील कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात कृषी विभागासाठी गट-अ ते गट-ड संवर्गाकरीता एकूण २७५०२ पदांचा आकृतिबंध मंजूर असून सद्य:स्थितीत त्यापैकी १८६२२ पदे भरलेली असून ८८८० पदे रिक्त आहेत. वरील पदांमध्ये तांत्रिक संवर्गाची २०१८१ पदे मंजूर असून त्यापैकी १४८०९ पदे भरलेली तर ५३७२ पदे रिक्त आहेत. लिपिकवर्गीय संवर्गाची ३४३६ पदे मंजूर असून २२३८ पदे भरलेली तर ११९८ पदे रिक्त आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

कृषी विभागातील तांत्रिक संवर्गातील कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, कृषी अधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी संवर्गातील बहुतांश पदे भरण्यात आली असून ज्या ठिकाणी पदे रिक्त आहेत अशा पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकारी/कर्मचारी यांचेकडे सोपवून कृषी विभागाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत सुक्ष्म नियोजन आणि गाव विकास आराखडे तयार करणे, ग्रामपंचायतीमध्ये ग्राम कृषी संजीवनी समित्या स्थापन करणे व कृषी ताईंची नेमणूक करणे, हवामान अनुकूल शेती

करण्यासाठी प्रकल्पांतर्गत विविध वैयक्तिक लाभाच्या घटकांची अंमलबजावणी करणे, मृद व जलसंधारणाची कामे, हवामान अनुकूल शेती शाळा राबविणे, शेतकरी गट/शेतकरी उत्पादक कंपन्यांना अर्थसहाय्य, हवामान अनुकूल वाणांचे व बियाणांचे बिजोत्पादन इ. घटकाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. रिक्त पदांमुळे सदर कामे ठप्प झालेली नसून ती सुरु आहेत.

(४) व (५) शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी मुख्यत: तांत्रिक संवर्गातील पदे महत्वाची आहेत. वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक १६ मे, २०१८ नुसार कृषी विभागातील तांत्रिक संवर्गातील १०० टक्के पद भरतीस मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत तांत्रिक संवर्गातील गट-अ व गट-ब मधील पदांसाठी शिफारस करण्यात आलेल्या ३९९ अधिकाऱ्यांना फेब्रुवारी, २०२० मध्ये पदस्थापना दिलेल्या आहेत. कृषी सेवकांच्या १४१६ पदांकरीता निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही संबंधित विभागीय कृषी सहसंचालक यांचेस्तरावर सुरू आहे. संचालक संवर्गातील ३ पदांवर दिनांक १९ नोव्हेंबर, २०२० रोजी पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेली आहे. गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विभागामार्फत सुरू आहे. तांत्रिक संवर्गातील पदे मुख्यत: भरण्यात आलेली असून प्रशासकीय संवर्गातील पदे भरण्यावर वित्त विभागाच्या दिनांक ४ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार निर्बंध असल्याने तुर्तास सदर पदे भरता येणार नाहीत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातील बावनथडी व वैनगंगा नदीपात्रातील अवैध रेती उत्खनन रोखण्याबाबत

**(४) * ७३२५ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातून वाहणाऱ्या बावनथडी व वैनगंगा नदीपात्रातून गत एक ते दीड महिन्यापासून अवैधरित्या यंत्राच्या सहाय्याने रेतीचे उत्खनन सर्रास सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध रेती उत्खननामुळे शासनाचे महसूल बुडत असून उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी महसूल प्रशासनाकडे तक्रार करुनही महसूल प्रशासनातील अधिकारी/कर्मचारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध रेती उत्खनन करणाऱ्या रेती माफियांवर तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या महसूल प्रशासनातील अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) तुमसर तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खननास प्रतिबंध करण्याकरीता तहसिल व उपविभाग स्तरावर भरारी पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर पथकामार्फत माहे एप्रिल, २०२० ते जानेवारी, २०२१ या कालावधीमध्ये ०३ प्रकरणामध्ये रुपये ३,१२,६२०/- एवढी दंडात्मक कार्यवाही करुन सदर रक्कम वसूल करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सहकारी व खाजगी यंत्रमाग उद्योग बंद असल्याबाबत

**(५) * ६५७० श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध शहरात विखुरलेल्या व राजकीय गटात विभागलेले यंत्रमाग लघु उद्योग गेल्या काही वर्षापासून डबघाईला आले असून, प्रादेशिक भेदभाव तसेच सहकारी व खाजगी उद्योगाच्या भेदभावामुळे यंत्रमाग बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यंत्रमागधारकांच्या पाच टक्के व्याज अनुदान प्रस्तावांना अनेक त्रुटी काढत मंजुरी दिली जात नाही, तर मोजक्या सहकारी गिरण्यांना करोडो रुपयांची बिनव्याजी कर्ज दिले जात असल्याने राज्यातील सर्व यंत्रमाग केंद्रातील यंत्रमाग संघटना मदतीसाठी शासनाकडे वारंवार मागणी करुनही याकडे शासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हतबल झालेल्या यंत्रमाग व्यावसायिकांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) प्रश्नामध्ये नमुद केलेली बाब दैनिक वर्तमानपत्रातून तसेच विटा यंत्रमाग औद्योगिक सहकारी संघ मर्या., विटा यांनी दिलेल्या निवेदनाव्दारे निदर्शनास आली आहे. तथापि, सदर बाब खरी नाही.

(२) हे खरे नाही.

राज्यातील यंत्रमागधारकांपैकी साध्या यंत्रमागधारकांनी शासन निर्णयापूर्वी विविध बँका किंवा वित्तीय संस्थाकडून घेतलेल्या व थकीत असलेल्या कर्जावर ५ टक्के व्याज सवलत अनुदान ५ वर्षांकरीता देण्याच्या अनुषंगाने विविध बँकांमार्फत कर्जाची उचल केलेल्या ९८ साध्या यंत्रमागधारकांना व्याज सवलत ही योजना शासन निर्णय, दिनांक ५ डिसेंबर, २०१७ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन आर्थिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये ९८ यंत्रमागधारकांपैकी आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांचेकडून प्राप्त झालेल्या पात्र ८४ यंत्रमागधारकांना रुपये ४२.०१ लाख इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे.

तसेच राज्यातील यंत्रमाग घटकाला राज्य शासनाने जाहीर केलेल्या वस्त्रोद्योग धोरण २०१८-२०२३ नुसार भांडवली अनुदान व वीज दरात सवलत दिली जाते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खिंडसी (ता.रामटेक, जि.नागपूर) क्षेत्रात अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याबाबत

**(६) * ७२३४ श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खिंडसी (ता.रामटेक, जि.नागपूर) या पर्यटन क्षेत्रात टेकडीवर एका दलित अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्काराची घटना घडल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपहरण व सामूहिक बलात्कार प्रकरणी ॲट्रॉसिटी कायद्यान्वये दोषी आरोपींवर कारवाई होण्यासाठी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी तक्रार व निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर घटनेतील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

सदरची घटना दिनांक २९/१२/२०२० रोजी घडलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर घटनेबाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन रामटेक येथे अपराध क्र. ०७/१५ कलम ३७६ (ड), ३६३ भादंवी सहकलम ६ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम (पोस्को ॲक्ट) सहकलम ३ (१)(११)(१२), ३ (२)(४) अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा अन्वये एकूण ०५ आरोपींविरूध्द दिनांक ०३/०१/२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्यातील आरोपी क्र. १ ते ५ यांना अटक करण्यात आली असून सध्या आरोपी हे न्यायालयीन कोठडीत आहेत. सद्य:स्थितीत सदर घटनेचा पोलीस तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भ आणि मराठवाड्यात बोगस सोयाबीन बियाणांमुळे बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(७) * ७४१५ श्री.राजेश राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकरी बोगस बियाणांमुळे आर्थिक अडचणीत आला असल्याचे माहे जून-जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून यामध्ये बोगस बियाणे महाबीजचे असून शासनाने महाबीजचे अनुदान थांबविल्यामुळे यावर्षी शेतकऱ्यांना महाग बियाणे खरेदी करावी लागले, महाबीजने सोयाबीनची तीस किलो बियाणांची एक बॅग रुपये १७०० ऐवजी रुपये २३०० रुपयांना विकली असून बोगस बियाणांमुळे सोयाबीन पेरूनही उगवले नसल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पेरलेले सोयाबीन बियाणे बोगस निघाल्यामुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकाची उगवण न झाल्याने अशा कंपन्याविरूध्द कारवाई करुन आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी परभणी जिल्ह्यातील १२ हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे केली आहे, तसेच जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सोयाबीन पेरणी करुनही सोयाबीन उगवण झाली नसल्याची तक्रार माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट उभे राहिले होते, दुबार पेरणी करुनही राज्यात काही ठिकाणी बियाणे उगविले नाही, त्यामुळे अनेक ठिकाणी तीन वेळा शेतकऱ्यांवर बियाणे पेरण्याची संकट उभे राहिले असून शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बोगस बियाणे उत्पादक प्रकरणी आर्थिक संगनमत केलेल्या कृषी विभागातील अधिकारी व गुण नियंत्रण अधिकारी यांच्या गैरकारभाराची चौकशी करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बोगस बियाणे कंपनी/उत्पादकावर गुन्हे नोंद करुन त्यांचेवर कारवाई करण्याबाबत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

खरीप-२०२० हंगामात विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांकडून सोयाबीन बियाणांच्या कमी उगवणीबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

सोयाबीन पिकाची उगवण न झाल्याच्या परभणी जिल्ह्यातील १२,८६१ शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तर जालना जिल्ह्यामध्ये २,७४० शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(३) हे खरे नाही,

दुबार पेरणीबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सदोष बियाणे प्रकरणी शेतकऱ्यांना बियाणे बदलून देण्याबाबत अथवा नुकसान भरपाई देण्याबाबतचे निदेश बियाणे कंपन्याना देण्यात आलेले आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) सदोष बियाणे प्रकरणी राज्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये ४२ बियाणे कंपन्यांविरोधात ८३ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. उगवणशक्ती न झालेल्या प्रकरणात संबंधित दोषी कंपन्यावर १९२ न्यायालयीन दावे दाखल केले असून अप्रमाणित नमून्यांचे अनुषंगाने १,०६५ न्यायालयीन दावे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच तक्रारींच्या अनुषंगाने एकूण २० कंपन्यांचे सोयाबीन बियाणे विक्री परवाने रद्द करण्यात आले आहेत.

राज्यात महाबीजने एकूण ३,७६४ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांपैकी ५९५ शेतकऱ्यांना ७७७.६० क्विंटल सोयाबीन बियाणे बदलून दिले असून उर्वरित ३,१६९ शेतकऱ्यांना रुपये २,४३,४१,४२२/- इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्यात आली आहे.

तसेच, खाजगी सोयाबीन बियाणे उत्पादक कंपन्यांनी ४,८०३ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांपैकी १,०८१ शेतकऱ्यांना १,०६८.५९ क्विंटल बियाणे बदलून दिले व उर्वरित ३,७२२ शेतकऱ्यांना रुपये २,४६,१०,७३३/- इतकी नुकसान भरपाई दिलेले आहे.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत

**(८) * ६५८७ श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे व ढगफुटीमुळे नुकसान झाले असून एकूण ११२९५० शेतकऱ्यांनी इफ्को टोकियो पीक विमा कंपनीकडे मूग, उडीद, सोयाबीन पिकाचा विमा उतरविला असून यापैकी फक्त १३१९९ शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत मिळाली असून उर्वरित ९९७५१ शेतकरी पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहिले असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

खरीप हंगाम-२०२० मध्ये नांदेड जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंमलबजावणी इफ्को टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत करण्यात आली. योजनेंतर्गत जिल्ह्यातील ९.५५ लाख शेतकरी अर्जदारांनी

रक्कम रुपये ४४.६५ कोटी विमा हप्ता भरुन ५.०४ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. संबंधित विमा कंपनीकडे प्राप्त झालेल्या पुर्वसूचनाच्या आधारे नांदेड जिल्ह्यात स्थानिक नैसर्गिक आपत्तीसाठी ६०५७५ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रुपये ५९.९८ कोटी व काढणी पश्चात नुकसान भरपाईसाठी १२३६९ शेतकऱ्यांना रक्कम रुपये १०.४३ कोटी जमा करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

विमा कंपनीकडे प्राप्त झालेल्या पुर्वसूचनाच्या आधारे मुखेड (जि.नांदेड) तालुक्यात स्थानिक नैसर्गिक आपत्तीसाठी ११७०३ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रुपये १२.०० कोटी व काढणी पश्चात नुकसान भरपाईसाठी १९७३ शेतकऱ्यांना रक्कम रुपये १.४५ कोटी जमा करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य राखीव पोलीस दलातील बदलीची अट शिथिल करण्याबाबत

**(९) * ६९६९ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य राखीव पोलीस दलामधून जवानांना जिल्हा पोलीस दलामध्ये बदली करतांना आवश्यक असलेली सेवा दहा वर्षे वरुन पंधरा वर्षे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य राखीव पोलीस दलातील जवान हे खडतर सेवा उदा. नक्षल बंदोबस्त, सुरक्षा बंदोबस्त, दंगा नियंत्रण अशा ठिकाणी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी कुटुंबापासून दूर असल्याने त्यांना स्वतःच्या जिल्ह्यात येण्याकरीता वीस ते पंचवीस वर्षे प्रतिक्षेत राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य राखीव पोलीस दलातील जवानांना कुटुंबासोबत राहून मूळ जिल्ह्यात सेवा देण्याची इच्छा व मागणी असल्याने राज्य राखीव पोलीस दलातील बदली करतांना पंधरा वर्षे सेवेची अट शिथिल/कमी करुन दहा वर्षे सेवा करण्याबाबतची मागणी राज्य राखीव पोलीस दलातील जवानांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य राखीव पोलीस दलातील बदलीची अट शिथिल करुन दहा वर्षे सेवा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्य राखीव पोलीस बलाच्या त्या त्या गटाच्या एकूण संख्येच्या १० टक्के कर्मचाऱ्यांच्या संख्येइतक्याच आणि त्या त्या जिल्हयाच्या ज्या त्या वेळेच्या रिक्त पदांच्या १० टक्के मर्यादेपर्यंत पदांवर कर्मचाऱ्यांची बदली करता येते. सदरच्या बदल्या सेवाज्येष्ठतेनुसार व जिल्हा बदलीच्या पसंतीक्रमाचा आढावा घेऊन करण्यात येत असल्याने काही जिल्हयात इच्छुकांची संख्या जास्त तर काही जिल्हयात कमी असल्याने त्यानुसार राज्य राखीव पोलीस बलातील कर्मचाऱ्यांना संबंधित जिल्हा पोलीस दलात बदलीसाठी लागणारा कालावधी कमी-अधिक होतो.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी दिनांक १५/०१/२०२१ रोजी मंत्रीस्तरावर झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार या प्रकरणी पोलीस महासंचालक व अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल यांनी एक समिती गठन करुन याविषयीचा सखोल अभ्यास करून या संदर्भात तसेच राज्य राखीव पोलीस बलातील पोलीस कर्मचारी यांच्या सेवाशर्ती अधिक आकर्षक कशा करता येतील याबाबत अहवाल सादर करण्याचे संकल्पित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद विभागीय क्रीडा संकुलातील कामे अपुर्ण असल्याबाबत

**(१०) * ६४१९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद विभागीय क्रीडा संकुलातील क्रीडांगणे व इमारती वसतिगृह यांची कामे अपुर्ण असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद विभागीय क्रीडा संकुलातील विविध क्रीडांगण अंतर्गत रस्त्यांच्या कामांकरीता तसेच क्रीडा संकुलात दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औरंगाबाद विभागीय क्रीडा संकुलातील कामे पूर्ण करण्यासाठी तसेच क्रीडा संकुलात दर्जेदार सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) नाही.
(२) याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) विभागीय क्रीडा संकुल, औरंगाबाद येथे विविध सुविधा उपलब्ध केल्या असून खेळाडू त्याचा नियमित सराव व स्पर्धेकरीता वापर करतात. सदर क्रीडा संकुलातील रस्त्यांचे काँक्रीटीकरण व संकुलातील परिसरात विद्युतीकरण याबाबतच्या प्रस्तावाची तपासणी करून कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नवोदित खेळाडूंना क्रीडा पुरस्कार जाहीर करण्याबाबत

**(११) * ७२०० श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दौंड, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या क्रीडा विभागामार्फत दरवर्षी क्रीडा क्षेत्रात कार्य करणाऱ्या खेळाडूंना शासकीय पुरस्काराने गौरविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवोदित खेळाडूंना खेळाचे अधिक विकासाबाबत प्रोत्साहन मिळून शासकीय खात्यात नोकरी मिळण्यासाठी क्रीडा विभागाचा पुरस्कार मिळणे उपयुक्त ठरत असताना शासनाने राज्यातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती, खेळाडू आणि संस्थांना शासनामार्फत दिले जाणारे पुरस्कार गत दोन वर्षापासून प्रदान केले नसल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील खेळाडूंना क्रीडा पुरस्कार जाहीर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व खेळाडूंनी शासनाकडे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील नवोदित खेळाडूंना क्रीडा पुरस्कार जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) होय.

क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने गौरविण्यात येते.

(२) नाही.

क्रीडा क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव व सन्मान करण्यासाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्यात येत आहे.

सन २०१८-२०१९ पर्यंत सदर पुरस्कारांचे वितरण करण्यात आले आहे. तथापि, कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे सन २०१९-२०२० या वर्षातील पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आले नाहीत. नियमावलीत सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३), (४) व (५) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार पुढील वर्षी जाहीर करण्याबाबत प्रायोजित आहे.

-----------------

## मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील डाळींब उत्पादक शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत

**(१२) * ७२५२ श्री.प्रशांत परिचारक, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील डाळींब उत्पादक शेतकऱ्यांनी पिकांची लागवड करुन पीक विमा उतरवूनही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी पीक विम्याची मदत मिळण्याबाबत मागणी करुनही पीक विमा कंपनीकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पीक विमा कंपनीवर कारवाई करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात डाळींब या फळपिकासाठी मृग बहार-२०१९ मध्ये ६४०८ शेतकऱ्यांना एकूण रुपये १,४४९.०५ लाख इतकी विमा नुकसान भरपाई संबंधित विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आली आहे. तसेच आंबिया बहार-२०१९-२०२० मध्ये ३७२२ शेतकऱ्यांना एकूण रुपये २,०८४.८७ लाख इतकी विमा नुकसान भरपाई देय झाली आहे.

मृग बहार-२०२० करीता डाळींब या फळपिकासाठी निश्चित करण्यात आलेला कोणताही हवामान धोका (ट्रिगर/प्रमाणके) सोलापूर जिल्हयामध्ये लागू झालेला नाही. त्यामुळे योजनेच्या अटी व शर्तीनुसार विमा कंपनीमार्फत विमा नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कोळीवाड्यांच्या सीमांकनाबाबत

**(१३) * ७१०६ श्री.कपिल पाटील, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.सुरेश धस, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ५१६७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मूळ भूमिपुत्र असलेला कोळी समाजाचे अस्तित्व टिकून राहावे म्हणून कोळीवाडे, गावठाणे यामध्ये राहणाऱ्या बांधवांच्या पारंपरिक मासेमारी व्यवसायासाठी सार्वजनिक उपक्रमासाठी जागा निश्चित करण्याबरोबर त्या कोळीवाड्यांना विस्तारासाठी मोकळी जमीन देण्याचे धोरण शासनाने स्वीकारले असून मुंबई महानगरपालिकेने केलेल्या १३ कोळीवाड्यांच्या सीमांकनावर मुंबईतील आद्य नागरिक असलेल्या कोळी नागरिकांनी हरकती घेतल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे, कोळीवाड्यांची विस्तारलेली घरे, दाटीवाटीची वस्ती आणि व्यवसायाच्या जागा निश्चित करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे, मुंबई शहर व मुंबई उपनगर येथील ४१ कोळीवाडा गावठाणापैकी किती सीमांकन पूर्ण झाली आहे,

(३) असल्यास, यासंदर्भात मच्छिमार नेते यांनी केलेल्या मागण्यांचे स्वरुप काय आहे, याबाबत शासनाची भूमिका काय आहे, मुंबईतील कोळीवाड्यांसाठी स्वायत्ता कोस्टल कौन्सिल स्थापण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील कोळी वाड्यांचे सीमांकन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) मत्स्यव्यवसाय विभागाच्या माहितीनुसार मुंबई शहर जिल्ह्यात १२ तर मुंबई उपनगर जिल्ह्यात २९ असे एकूण ४१ कोळीवाडे आहेत. सदर कोळीवाड्यांच्या सीमांकनाबाबतची कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी दिनांक २०/११/२०१२ च्या शासन निर्णयान्वये एक समिती गठित करण्यात आली होती. त्यानुषंगाने, उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांनी दिनांक ०१/०१/२०१८ च्या पत्रान्वये प्रत्यक्ष कोळीवाड्यांचा स्थळ पाहणी करून शासनास सादर केलेला अहवाल स्वीकारण्यास शासनाने मान्यता दिली. सदर मान्यतेनुसार मुंबईतील कोळीवाड्यांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन सीमांकन करण्याचे शासनाने निश्चित केले आहे.

उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांनी दिनांक २४/१२/२०१८ व १२/०२/२०१९ च्या पत्रान्वये मुंबई उपनगरामधील १४ कोळीवाड्यांचे सर्वेक्षण व सीमांकनाबाबतची कार्यवाही करून शासनास अहवाल सादर केला. महसूल विभागाने यापैकी मुंबई उपनगरातील १२ कोळीवाड्यांचे सीमांकन गावठाणाच्या हद्दीमध्ये करण्याच्या शिफारशीसह सदर कोळीवाड्यांचे सर्वेक्षण व सीमांकनाबाबतचा अहवाल व नकाशे दिनांक ०१/०३/२०१९ च्या पत्रान्वये नगर विकास विभागास विकास आराखड्यात समावेश करण्याकरीता उपलब्ध करून देण्यात आले. त्यानुषंगाने नगर विकास विभागाने सदर कोळीवाड्यांचे सर्वेक्षण व सीमांकनाबाबतचा अहवाल व नकाशे बृहन्मुंबई महानगरपालिकेस अग्रेषित केले असता, संबंधित कोळीवाड्यांच्या सीमांकनाचे नकाशे बृहन्मुंबई महानगरपालिकेने विकास नियोजन आराखडा-२०३४ च्या जी.आय.एस. प्रणालीवर प्रतिबिंबित करण्याची कार्यवाही करून, त्यावर जनतेकडून सूचना/हरकती १ महिन्यात सादर करण्यासाठी दिनांक ०२/१०/२०२० च्या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस सूचना/हरकती प्राप्त झाल्या असून, सदर सूचना/हरकती बृहन्मुंबई महानगरपालिकेने उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांना सादर केल्या आहेत. प्राप्त झालेल्या सूचना/हरकती यांच्या अभ्यास करण्यात येवून पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

त्यानंतर ६ कोळीवाड्यांमधील स्थानिक रहिवाश्यांनी विरोध केल्याने सीमांकन मोजणी करता आली नाही. परंतु, ९ कोळीवाड्यांचे मत्स्यव्यवसाय विभागाचे प्रतिनिधींनी दाखविलेल्या सीमांकनाबाबत संबंधित कोळीवाड्यांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत बाहेरील हद्दीच्या मोजणीची कार्यवाही पूर्ण करून, उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांनी दिनांक ११/१२/२०१९ रोजी अहवाल शासनास सादर केला आहे. सदर ९ कोळीवाड्यांचे सीमांकन गावठाणाच्या हद्दीमध्ये करण्याच्या शिफारशीसह सदर कोळीवाड्यांचे सर्वेक्षण व सीमांकनाबाबतचा अहवाल व नकाशे दिनांक २१/०८/२०२० च्या पत्रान्वये नगर विकास विभागास विकास आराखड्यात समावेश करण्याकरीता उपलब्ध करून देण्यात आले.

तसेच मुंबई शहर जिल्ह्यातील ७ कोळीवाड्यांच्या बाहेरील हद्दीची मोजणी करून उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांनी दिनांक २९/०१/२०१९ रोजी मोजणी नकाशासह अहवाल सादर केला आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील कोळीवाड्यांच्या सीमांकनामधील मिळकती या विविध प्राधिकरणांच्या मालकी व खाजगी मालकीचे असल्याचे दिसून आले आहे. परंतु सीमांकन करताना वरील प्राधिकरणांना जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, मुंबई शहर यांनी कोणत्याही प्रकारची नोटीस दिलेली नाही अथवा त्यांचे म्हणणे घेतलेले नाही. ही बाब विचारात घेऊन नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन होण्याच्या दृष्टीने मुंबई शहर जिल्ह्यातील कोळीवाड्यांचे सीमांकन अंतिम करण्यापूर्वी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयाकडून नमुद सर्व प्राधिकरणांना म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येऊन, त्यांचे अभिमत नोंदवून घेऊन स्वयंस्पष्ट अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तद्नुसार शासनास सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना देण्यात आल्या आहेत. याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडून कार्यवाही सुरू आहे. तसेच मुंबई शहर जिल्ह्यातील अन्य कोळीवाड्यांची मोजणी करणेबाबत स्थळ पाहणीव्दारे खात्री करून अहवाल सादर करण्यास उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

मुंबईतील कोळीवाड्यांसाठी स्वायत्ता कोस्टल कौन्सिल स्थापण्याबाबतच्या मागणीचे मच्छिमार नेते यांच्याकडून कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई/ठाणे येथे मासेमारी पास/परवाने मिळविण्याचे कार्यालय सुरु करण्याबाबत

**(१४) * ७०६९ श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, श्री.सुरेश धस, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ५४४७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, वाशी व बेलापूर येथील मत्स्यव्यवसाय करणाऱ्या महिलांना फिशिंग पास व फॉर्म नंबर २ घेण्यासाठी पालघर येथे जावे लागत असून नवी मुंबई ते पालघर हे अंतर प्रवासाच्यादृष्टीने महिलांना खूपच गैरसोयीचे व त्रासदायक होत असल्याने नवी मुंबईत मध्यवर्ती ठिकाणी फिशिंग पासचे कार्यालय उपलब्ध करून द्यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व कोळी बांधवांनी मत्स्यव्यवसाय विभागाकडे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्याच्या निर्मितीनंतर मत्स्यव्यवसाय विभागाचे ठाणे व पालघर जिल्ह्यासाठी स्वतंत्र जिल्हा कार्यालय निर्माण करणे व सदर कार्यालयासाठी पदनिर्मिती करण्याच्या प्रस्तावावर शासनस्तरावर सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, सदरहू कार्यवाही किती कालावधीत पूर्ण होणार आहे, याबाबतची सद्य:स्थितीची काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवी मुंबई/ठाणे येथे मासेमारी पास/परवाने मिळविण्याचे कार्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) ठाणे व पालघर जिल्ह्यासाठी स्वतंत्र जिल्हा कार्यालय निर्माण करणे व सदर कार्यालयासाठी पदनिर्मिती करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## थेरोंडा गणपतीवाडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील जेट्टी बांधण्यासाठी निधी देण्याबाबत

**(१५) * ६९८५ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४७७९६ ला दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेवदंडा ग्रामपंचायत (ता.अलिबाग, जि.रायगड) हद्दीतील थेरोंडा गणपतीपाडा डोऱ्याचीवाडी येथील खाडीवर जेट्टी नसल्यामुळे तसेच समुद्राच्या उधानामुळे आणि झालेल्या वादळामुळे खाडीची मोठी धुप झाली (खांड पडलेली) असल्यामुळे मच्छीमारांना मासे उतरविणे, जाळी व इतर साहित्यांची चढ-उतार करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, थेरोंडा गावामध्ये मच्छीमारी करणाऱ्या यांत्रिकी व बिगर यांत्रिकी नौका १०० पेक्षा जास्त नौका असून थेरोंडा गणपतीपाडा डोऱ्याचीवाडी येथे लहान मासेमारी बंदरे (४४०५ २७९७) अन्वये जेट्टी बांधण्यास शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सदर जेट्टीचे काम न झाल्यामुळे शासनाकडे परत वर्ग करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन थेरोंडा गणपतीवाडा येथील जेट्टी बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे. मात्र सदर कामाचे नाव गणपतीवाडा डोऱ्याचीवाडी थेरोंडा येथे स्लोपिंग पक्टी (रुंदी वाढविणे) बांधणे असे आहे.
(३) जिल्हा नियोजन समिती, रायगड - अलिबाग यांना समर्पित केलेला निधी जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती रायगड-अलिबाग यांचे दिनांक २१/०१/२०२० रोजीच्या आदेशान्वये सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रायगड या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

सदरचे काम निविदास्तरावर असून सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रायगड कार्यालयामार्फत सदर कामाचा निधी पत्तन अभियंता यांच्याकडे दिनांक ०८/०२/२०२१ रोजी वर्ग करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील चोरीचे प्रमाण रोखण्याबाबत

**(१६) * ६७१४ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड (जि.नांदेड) शहर व परिसरात घरफोडीसह वाहन चोरीच्या घटना वाढत असून याकडे पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाहूनगर (ता.किनवट, जि.नांदेड) येथे राहणाऱ्या निलाबाई महादू गरुड या महिलेच्या घरावर दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास चोरट्यांनी घरफोडी करुन रुपये १,७८,५०० इतक्या रकमेचा माल चोरल्याचे तसेच आष्टूर (ता.लोहा, जि.नांदेड) येथे चोरट्यांनी एकाच रात्री ४

घरफोड्या करुन एकाच घरातून रुपये ४,०२,००० किंमतीचे सोन्याचे दागिने चोरी केल्याचे दिनांक २५ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदेड येथील गोविंद गंगाराम बोडेवार यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण रुपये ४१ हजारांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली असून उक्त प्रकरणी मुखेड पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यातील चोरीच्या गुन्ह्याचा तपास करुन चोरट्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच चोरीचे प्रमाण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख** : (१) चोरीच्या घटनांकडे पोलिसांचे दुर्लक्ष होत आहे. हे म्हणणे खरे नाही. नांदेड जिल्ह्यात माहे जानेवारी, २०२० व माहे जानेवारी, २०२१ ची तुलनात्मक माहिती खालीलप्रमाणे-

| अ.क्र | गुन्हा | घडलेले गुन्हे | | गुन्हयात वाढ / घट |
|---|---|---|---|---|
| | | २०२० | २०२१ | |
| १ | घरफोडी | २९ | १६ | - १३ |
| २ | जबरी चोरी | १४ | १२ | - २ |
| ३ | सर्व चोऱ्या | ८५ | १०० | + १५ |

सर्व चोऱ्या सदराखाली माहे जानेवारी, २०२१ मध्ये दाखल गुन्ह्यांपैकी ५८ गुन्हे वाहन चोरी संबंधित आहेत.

(२) शाहुनगर (ता.किनवट, जि.नांदेड) येथे घडलेल्या चोरीच्या घटनेबाबत दिनांक १४/१२/२०२० रोजी पोलीस स्टेशन, किनवट येथे गु.र.नं. ३५३/२०२० भा.दं.वि. कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी एकूण ४ आरोपी निष्पन्न असून २ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तसेच मौजे आष्टुर येथे घडलेल्या चोरीच्या घटनेबाबत दिनांक २३/१२/२०२० रोजी पोलीस स्टेशन, माळाकोळी येथे गु.र.नं.२४८/२०२० भा.दं.वि. कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) सदर प्रकरणी दिनांक १२/१०/२०२० रोजी पोलीस स्टेशन, मुदखेड येथे गु.र.नं. २०४/२०२० भा.दं.वि. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) नांदेड जिल्ह्यात चोरी, घरफोडी व मालमत्ता संबंधित गुन्हे उघडकीस आणणेकरीता पोलीस स्टेशनमध्ये डिटेक्शन ब्रांच कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. तसेच नांदेड शहरात २४ बीट मार्शलव्दारे पेट्रोलींग, नाईट पेट्रोलींग, केंद्रीय नाईट पेट्रोलींग योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच दररोज सकाळी गुडमॉर्नींग पेट्रोलींग नेमण्यात येवून धार्मिक स्थळांची चेकींग/पाहणी करण्यात येते. तसेच नांदेड शहरात सेफ सिटी प्रोजेक्ट अंतर्गत महत्वाच्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## कुडपण धनगरवाडी (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथे ट्रकचा अपघात झाल्याबाबत

**(१७) * ६४१६ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडपण धनगरवाडी (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथे दिनांक ८ जानेवारी, २०२१ रोजी लग्नाच्या वऱ्हाडाचा ट्रक सुमारे १५० ते २०० फुट खोल दरीत कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात तीन व्यक्तींचा मृत्यू व १०० व्यक्ती जखमी झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कुडपण धनगरवाडी येथे वाहन अपघात होऊ नये याकरीता खबरदारीची व सुरक्षिततेची उपाययोजना म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) सदर घटनेत एकूण ४ व्यक्तींचा मृत्यू झाला असून एकूण ६८ व्यक्ती गंभीर व किरकोळ जखमी झालेले आहेत.
(२) सदर प्रकरणी पोलादपूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३/२०२१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. खबरदारी व सुरक्षिततेची उपाययोजना म्हणून बॅरिकेटिंग व रस्ता निदर्शक लावण्यात आले आहे.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभागास अपघाताच्या ठिकाणी साईडपट्टी भरून काढणे, संरक्षण कठडे बांधणे तसेच सूचना फलक लावण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयातील अपघातग्रस्त शेतकऱ्यांना स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतून मदत देण्याबाबत

**(१८) * ७१६८ श्री.विनायकराव मेटे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ५७६६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जायका इन्शुरन्स ब्रोकर्स प्रा.लि., नागपूर, दि ओरीएंन्टल इन्शुरन्स कं.लि. व दि युनिवर्सल सोम्या जनरल इन्शुरन्स कं.लि. यांनी प्रति शेतकरी रुपये २२.६६ वर्ष इतका विमा हप्ता दर मान्य केला आहे, त्यानुसार ३१,०३,८४,३०० ब्रोकरेजसह विमा हप्ता रक्कमप्रमाणे आजपर्यंत किती प्रस्ताव मान्य केले आहे,
(२) असल्यास, शेतकरी व कुटुंबातील वहितीधारक खातेदार शेतकऱ्यांच्या विमा संरक्षणापोटी शासनाने कंपनी व विमा सल्लागार कंपनीत किती रक्कम भरली आहे,
(३) असल्यास, सदर योजना दिनांक २६ नोव्हेंबर, २०१५ रोजी कार्यान्वित करण्यात आली असून बीड जिल्हयातून सन २०१८-२०१९ मध्ये १११ प्रस्ताव कृषी विभागाकडे पाठविले, यामधील फक्त २८ प्रस्ताव मंजूर करण्यात आले तर २ प्रस्ताव नाकारण्यात आले, यापैकी ११ प्रस्तावात त्रुटी आढळून आल्या आहेत तर ७० प्रस्ताव प्रलंबित आहेत असे एकूण ८१ प्रस्ताव विमा कंपनीच्या निष्काळजीपणामुळे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त तीन कंपनीच्या नावे शासनाने रुपये ९५ कोटी ५ लाख ८३४ इतकी रक्कम भरली असूनही विमा कंपनीने शेतकरी कुटुंबातील सदस्यांना विम्याच्या लाभापासून वंचित ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बीड जिल्ह्यातील अपघातग्रस्त शेतकरी कुटुंबियांना स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतून मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ मध्ये दि ओरिएंन्टल इन्शुरन्स कं.लि. पुणे या विमा कंपनी व जायका इन्शुरन्स ब्रोकरेज प्रा.लि. नागपूर या विमा सल्लागार कंपनीमार्फत महाराष्ट्रात राबविण्यात आली आहे. सन २०१७-२०१८ मध्ये प्रति शेतकरी रुपये ३१.७५ इतका विमा हप्ता दर मान्य करण्यात येऊन ब्रोकरेजसह रुपये ४३.६३ कोटी रक्कम विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीस अदा करण्यात आली आहे. सन २०१७-२०१८ मध्ये दिनांक ५/०२/२०२१ अखेर एकूण २६७१ विमा प्रस्ताव मंजूर केले असून रुपये ५२.८२ कोटी इतकी रक्कम शेतकरी कुटुंबियांना विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे. सन २०१८-२०१९ मध्ये प्रति शेतकरी रुपये ३४.५० इतका विमा हप्ता दर मान्य करण्यात येऊन ब्रोकरेजसह रुपये ४७.३३ कोटी रक्कम विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीस अदा करण्यात आली आहे. सन २०१८-२०१९ मध्ये दिनांक ५/०२/२०२१ अखेर एकूण २४२५ विमा प्रस्ताव मंजूर केले असून रुपये ४८.३८ कोटी इतकी रक्कम शेतकरी कुटुंबियांना विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे व एकूण ४३५ प्रस्ताव कंपनीकडे कार्यवाहीत आहेत.

गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत सन २०१९-२०२० मध्ये कुटुंबालाही विमा संरक्षण देण्यात येवून सदरील योजना दि युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी लि. या विमा कंपनी व दि ओरिएंन्टल इन्शुरन्स कं.लि. पुणे या विमा सल्लागार कंपनीमार्फत महाराष्ट्रात राबविण्यात आली. विमा कंपनीमार्फत प्रति शेतकरी रुपये ३२.२३ इतका विमा हप्ता दर मान्य करण्यात येऊन ब्रोकरेजसह विमा कंपनी व विमा सल्लागार

कंपनीस एकूण रुपये ९८.०५ कोटी रक्कम अदा करण्यात आली आहे. सन २०१९-२०२० मध्ये दिनांक ५/०२/२०२१ अखेर एकूण १३०५ विमा प्रस्ताव मंजूर केले असून रुपये २७.०२ कोटी इतकी रक्कम शेतकरी कुटुंबियांना विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे व एकूण ७०२ प्रस्ताव कंपनीकडे कार्यवाहीत आहेत.

(३) अंशतः खरे आहे

दिनांक ५/०२/२०२१ अखेरपर्यंत बीड जिल्हयातील सन २०१८-२०१९ मध्ये एकूण १७८ विमा प्रस्ताव प्राप्त होते त्यापैकी १२० विमा प्रस्ताव मंजूर केले असून १७ विमा प्रस्ताव नामंजूर केले आहेत आणि २३ प्रस्ताव कागदपत्रांच्या अभावी प्रलंबित असून १८ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहे.

(४) हे खरे नाही.

(५) विमा प्रस्तावातील त्रुटींची पुर्तता करण्यासाठी व प्रलंबित विमा प्रस्ताव निकाली काढण्यासाठी दिनांक २३/१०/२०२० रोजी जिल्हाधिकारी, बीड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची आढावा बैठक विमा प्रतिनिधी समवेत घेण्यात आली.

तसेच विमा प्रस्तावातील आवश्यक असलेल्या त्रुटींची पुर्तता करण्यासाठी कृषी आयुक्तालय स्तरावरुन व विभागीय स्तरावरुन आढावा बैठकांचे आयोजन करण्यात येते. त्यानुषंगाने विभागीय स्तरावर विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय, औरंगाबाद येथे दिनांक ०३/०२/२०२१ रोजी विमा कंपनी प्रतिनिधी समवेत विमा प्रस्तावातील त्रुटी पुर्ततेसाठी आढावा बैठकीचे आयोजन करुन सन २०१८-२०१९ मधील १ व सन २०१९-२०२० मधील १४ विमा प्रस्तावांतील त्रुटींची पुर्तता करण्यात आली.

(६) सदर योजनेंतर्गत विमा प्रस्ताव हे शेतकरी कुटुंबाकडून आवश्यक असणाऱ्या कागदपत्राच्या पुर्ततेअभावी प्रलंबित राहतात. बहुतांशी प्रकरणामध्ये ७/१२, ६-क, ६-ड, व्हिसेरा अहवाल, पोलीस अंतिम अहवाल इत्यादी कारणांचे कागदपत्राअभावी विमा प्रकरणे प्रलंबित राहतात, असे निदर्शनास आलेले आहे.

-----------------

## पाचोळा (ता.पेण, जि.रायगड) आदिवासीवाडीतील लहान मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याबाबत

**(१९) * ६६७४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दौंड, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथे बलात्काराच्या गुन्ह्यातून जामिनावर सुटलेल्या नराधमाने पेण शहरातील पाचोळा आदिवासीवाडी (जि.रायगड) येथील आदिवासी समाजाच्या तीन वर्षाच्या मुलीला झोपेत असताना घराबाहेर उचलून नेऊन तिच्यावर अतिप्रसंग व लैंगिक अत्याचार करुन हत्या केल्याची घटना दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटना स्थळास स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांसह मा.पालकमंत्री रायगड जिल्हा तसेच विरोधी पक्षनेता, विधानपरिषद यांनी पिडीत कुटुंबियांची भेट घेऊन याबाबतचा खटला जलदगती न्यायालयात (फास्ट ट्रॅक कोर्टात) चालवून आरोपी नराधमास शिक्षा करण्यात यावी तसेच पिडीत कुटुंबाला आर्थिक सहाय्य करावे, अशी आग्रही मागणी मा.गृह मंत्री यांच्याकडे केली आहे, सदरील प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण तपशील काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कारवाई करुन पिडीत कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी आरोपीविरूध्द भा.दं.वि.सं. कलम ३७६(I)(J), ३७६अ, ३७६अब, ३७७, ४५२, ४५५, ३६३, ३६६(अ), ४४८, ३०२, २०१, ४५०, ७५ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ५(जे)(४), ५(एम), ६, ८, १२ सह अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ सुधारणा अधिनियम, २०१५ चे कलम ३(१)(w)(i)(ii), ३(२)(v) अन्वये गु.र.क्र. १६८/२०२० असा गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणातील आरोपीस अटक करण्यात आली असून, दिनांक ०८/०२/२०२१ पर्यंत पोलीस कोठडी व तद्नंतर न्यायालयीन कोठडी मिळालेली आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने दिनांक २८/०१/२०२१ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, विशेष सरकारी वकील म्हणून श्री.उज्ज्वल निकम यांची नेमणूक करण्याबाबत व प्रकरण जलदगती न्यायालयात चालविण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

सदरहू प्रकरणी पिडितेच्या वडिलांना रुपये ४,१२,५००/- इतके अर्थसहाय्य दिनांक ०५/०१/२०२१ रोजी अदा करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मासेमारी पध्दतीचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या अभ्यास गटाच्या अहवालाबाबत

**(२०) * ६५९० श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सागरी मत्स्यसाठा व मासेमारीवर होणारा पर्यावरणाचा परिणाम तसेच मासेमारी पध्दतीचा अभ्यास करण्यासाठी शासनाने नेमलेल्या डॉ.सोमवंश समितीने आपला अहवाल गतवर्षी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार सध्या कार्यरत असलेल्या ४७६ पर्ससीन मासेमारी परवान्यापैकी अंतिम १८२ पर्ससीन मासेमारी परवान्यांची निवड कशी करावी तसेच राज्याच्या सागरी जलक्षेत्रापलिकडील विशेष आर्थिक क्षेत्रातील १२ सागरी मैलापलिकडील मासेमारी करण्यास राज्य शासन सक्षम आहे की नाही, यानुषंगाने अभ्यास होऊन मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी सेंट्रल फिशरीज एज्युकेशन इन्स्टिटयूटचे उपकुलगुरु तथा भारतीय अनुसंधान परिषदेचे संचालक डॉ.गोपाल कृष्णा यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यांचा अभ्यासगट पुन्हा नेमण्यात आल्याचे दिनांक ७ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अभ्यास गटाने आपला अहवाल दोन महिन्यात शासनास सादर करावा असा शासन निर्णय मत्स्यव्यवसाय विकास विभागाने निर्गमित केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तुत अभ्यास गटाने आपला अहवाल शासनास केव्हा सादर केला,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) हे खरे नाही.

पर्ससीन नेट पध्दतीने होणाऱ्या मासेमारीबाबत अभ्यास करण्याकरीता कै.डॉ.सोमवंशी, माजी महानिदेशक, फिशरी सर्व्हे ऑफ इंडिया यांचे अध्यक्षतेखाली शासन निर्णय क्र.मत्स्यवि-२०११/प्र.क्र.२१२/पदुम-१४, दिनांक ०९ सप्टेंबर, २०११ अन्वये गठीत केलेल्या समितीने दिनांक १० मे, २०१२ रोजी अहवाल शासनास सादर केला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) कोरोना-१९ प्रादुर्भावामुळे अभ्यास गटास अहवाल सादर करण्यासाठी शासन आदेश क्र.मत्स्यवि-११२०/प्र.क्र.७८/पदुम-१४, दिनांक १७/०२/२०२१ अन्वये ३१ मे, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यातील वाळू चोरी रोखण्याबाबत

**(२१) * ६९१३ डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) शहर व तालुक्यात अवैधरित्या वाळू चोरी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुसद शहर व तालुक्यात होत असलेली वाळू चोरी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सायबर गुन्हे विभागात प्रशिक्षित अधिकारी व अत्याधुनिक साधने उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२२) * ६४७६ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सायबर गुन्ह्यांमध्ये गत ५ वर्षात १६ हजारांपेक्षा जास्त गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यातील केवळ ४५३० गुन्ह्यांची उकल झाल्याचे निदर्शनास आले असून राज्यातील सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी नवी मुंबईतील महापे येथे अद्ययावत सायबर प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहे काय, त्यासाठी रुपये ९१५ कोटी खर्च करण्याचा प्रस्ताव असून सायबर सुरक्षेविषयीचा कायदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असून गत वर्षभरात दाखल २ हजार ४३५ गुन्ह्यांपैकी फक्त २०७ गुन्ह्यांचा तपास करण्यास पोलिसांना यश आले आहे, तसेच लॉकडाऊनच्या काळात राज्यभरात सायबर गुन्ह्यात १७ टक्के वाढ झाली असून नागरिकांमध्ये कोरोनाची दहशत निर्माण करुन नागरिकांची माहिती जाणून घेवून तसेच जागतिक आरोग्य संस्था (डब्ल्यूएचओ) किंवा तत्सम नामांकित खाजगी किंवा शासकीय यंत्रणेच्या नावाने फसवे ई-मेल करुन नागरिकांची/ई-मेल वापरकर्त्यांचे तपशील पासवर्ड चोरुन त्यांच्या बँक खात्यातून पैसे चोरी गेल्याचे प्रकार निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापे येथे अद्ययावत प्रयोगशाळा उभारण्यासाठी प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करण्यात आला आहे, प्रयोगशाळा उभारण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, तसेच सायबर सुरक्षेविषयीचा कायदा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, पुणे शहरासह राज्यात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले असून गत ११ महिन्यांत सायबर पोलिसांकडे पुणे शहरात १४ हजार तक्रारी दाखल झाल्या असल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्याने या गुन्ह्यांचा जलद निपटारा करण्यासोबत येथील सायबर सेलला कुशल मनुष्यबळ व अत्याधुनिक साधने उपलब्ध करुन देण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवी मुंबईतील महापे येथे अद्ययावत सायबर प्रयोग शाळा उभारण्यात तसेच राज्यातील मुंबई व पुणे शहरात सायबर गुन्ह्यांची जलदगतीने निपटारा होण्याकरीता कुशल मनुष्यबळ, अत्याधुनिक साधने व प्रशिक्षित अधिकाऱ्यांची सायबर गुन्हे विभागात उपलब्धता करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

संपूर्ण राज्यातून सन २०१६ ते सन २०२० या कालावधीमध्ये १९७७५ गुन्ह्यांची नोंद झाली असून ४७३६ गुन्ह्यांची उकल झाली आहे. सदर गुन्ह्यांमध्ये ६०९७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

राज्यातील सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी नवी मुंबईतील महापे येथील मिलेनियम बिझनेस पार्कमधील इमारत क्र.१०२ व १०३ येथील १०८५९.८५९ चौरसफूट जागा सायबर प्रयोगशाळेसाठी घेण्यात आली नसुन महाराष्ट्र सायबर कार्यालयासाठी घेण्यात आली आहे.

सायबर सुरक्षेविषयीचा कायदा करण्याची बाब राज्य शासनस्तरावर सद्य:स्थितीत विचाराधीन नाही.

सायबर गुन्ह्यांवर प्रभावी आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने माहिती तंत्रज्ञान कायदा, २००५ अन्वये शिक्षेच्या तरतुदी केल्या आहेत.

(२) मुंबई शहर पोलीस घटकाकडून प्राप्त सायबर गुन्ह्यांच्या सांख्यिकी माहितीच्या अनुषंगाने २४०८ गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी १९२ गुन्हे उघडकीस आले आहेत तर २७९ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सर्व राज्यातील पोलीस घटकातील सायबर गुन्ह्यांच्या प्राप्त सांख्यिकी माहितीनुसार वर्ष २०१९ मध्ये ४८२२ गुन्हे दाखल असून वर्ष २०२० मध्ये ५४५८ गुन्हे दाखल झाले आहेत.

नागरिकांमध्ये कोरोनाची दहशत निर्माण करून नागरिकांची माहिती जाणून घेवून कोणत्याही शासकीय यंत्रणेच्या नावाने फसवे ई-मेल करून नागरिकांची/ई-मेल वापरकर्त्यांचे तपशील पासवर्ड चोरून त्यांचे बँक खात्यातून पैसे चोरी गेल्याचे प्रकार निदर्शनास आलेले नाहीत.

(३) महाराष्ट्र सायबर कार्यालयाकडून सायबर गुन्ह्यांविरोधात दीर्घकालीन व कायमस्वरूपी उपाययोजना असावी या धोरणातून महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प उभारण्याचे नियोजन असून या प्रकल्पासाठी कायमस्वरूपी कार्यालय असावे या तयारीतून महापे येथे महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पासाठी इमारत खरेदी करण्यात आली आहे.

सदर इमारतीची संरचनात्मक तपासणी पूर्ण झाली असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) सर्व प्रकारचे ऑनलाईन फ्रॉड रोखण्याकरीता महाराष्ट्र सायबर कार्यालयाकडून उपलब्ध सर्व आधुनिक संसाधने जसे प्रेस, टिव्ही चॅनल्स, युट्युब, ट्विटर, फेसबुक, वेबसाईटचा उपयोग करून जनजागृती करण्यात आली आहे. तसेच विविध जनजागृती शिबिरे भरवून आजतागायत ६४२३४ नागरिकांना सायबर सुरक्षेबाबत जागृत केले आहे.

नवी मुंबईतील महापे येथे अद्ययावत सायबर कार्यालय स्थापन करण्याची तसेच कुशल मनुष्यबळ, अत्याधुनिक साधने व प्रशिक्षित अधिकाऱ्यांची सायबर गुन्हे विभागात उपलब्धता करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पातूर (जि.अकोला) तालुक्यातील अवैधरित्या मुरुम व गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२३) * ६८८४ श्री.गोपिकिशन बाजोरीया : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १२ मधील प्रश्न क्रमांक ५८४२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातूर (जि.अकोला) तालुक्यातील अकोला-वाशिम या मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम मोंन्टेंकार्लो कंपनी करीत असून या कंपनीने मुरुमाचे पाच हजार ब्रास अवैध उत्खनन केल्याची तक्रार या भागातील नागरिकांनी जिल्हाधिकारी, अकोला व तहसिलदार, पातूर यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली तसेच पातूर (जि.अकोला) तालुक्यातील शिर्ला फाट्याजवळ रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम सुरु असताना कंत्राटदाराने शासनास रॉयल्टी न भरता अवैधरित्या खोदकाम करून गौण खनिज उत्खनन व वाहतूक करीत असल्याबाबतची तक्रार स्थानिक नागरिकांनी तहसिलदार, पातूर यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैधरित्या मुरुम, गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्या कंपनी व कंत्राटदारावर शासन निर्णयानुसार पाच पट दंड आकारुन दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत महसूल विभागाने प्रस्तावित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, पातूर यांनी संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी यांचेकडून मागविलेल्या अहवालानुसार तसेच संबंधित कंपनीकडून अवैध उत्खननाबाबत स्पष्टीकरण मागविले होते, त्यांचेकडून प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बाळापूर यांचेकडून तांत्रिक अहवाल मागविण्यात आला असून उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बाळापूर यांच्याकडून मोजमापाबाबत दिनांक २७/११/२०२० रोजी अहवाल प्राप्त झाला असून त्यावर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अभियंता यांचा अहवाल घेवून नियमानुसार जिल्हाधिकारी, अकोला यांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पातूर तालुक्यात अवैधरित्या मुरुम, गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करुन दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१) व (२) हे खरे आहे.

(३) मॉन्टेंकार्लो कंपनीविरुध्द गौण खनिजाच्या अवैध उत्खनन प्रकरणी तहसिलदार, पातूर यांनी दिनांक १२/०२/२०२१ रोजी रुपये ७९,५९,६००/- एवढ्या दंडात्मक रकमेचे आदेश पारीत केले आहेत.

(४) नियमाप्रमाणे वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाथरी (जि.परभणी) येथील लाचखोर पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२४) * ६८६३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथील पोलीस उपनिरीक्षक श्री.कोरके व इतर अधिकाऱ्यांनी सर्व सामान्य नागरिकांकडून अवैध पैसे वसुली करुन पदाचा दुरुपयोग केल्याप्रकरणी तेथील नागरिकांनी पोलीस अधीक्षक, परभणी यांच्याकडे सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार नोंदविली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक फसवणूक व अडवणुक प्रकरणी नागरिकांनी दोषी पोलीस अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची लाचलुचपत विभागामार्फत चौकशी करण्याच्या तक्रारी केल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, याबाबतची सविस्तर माहिती काय आहे,

(३) असल्यास, पोलीस अधीक्षक, परभणी यांनी दोषींना निलंबन व त्यांच्याविरूध्द इतर कारवाई करण्याबाबतचे आदेश माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पदाचा दुरुपयोग करुन अवैध पैसे वसुली करणाऱ्या दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) तक्रारदार श्री.आयुब खान वली महम्मद खान व त्यांच्या नातेवाईकांच्याविरुध्द दाखल गुन्हा क्र. ४११/२०२० या गुन्ह्यामध्ये श्री आयुब खान व त्यांच्या नातेवाईकांना जामीन मिळण्यासाठी सहकार्य करण्याकरीता लोकसेवक श्री.टोपाजी एकनाथराव कोरके, पोलीस उपनिरीक्षक यांनी पैशाची मागणी केली व पैसे स्वीकारले याबाबत पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी यांच्याकडे दिनांक २ डिसेंबर, २०२० रोजी लेखी तक्रार प्राप्त झाली.

(२) लोकसेवक श्री.टोपाजी कोरके यांच्या मालमत्तेची उघड चौकशी करण्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी यांच्याकडे कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(३), (४) व (५) तक्रारदार श्री.आयुब खान वली महम्मद खान यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लोकसेवक श्री.टोपाजी कोरके यांना पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी यांच्या दिनांक २ डिसेंबर, २०२० रोजीच्या आदेशान्वये त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

-----------------

## शिर्डी (जि.अहमदनगर) येथून बेपत्ता होणाऱ्या भाविकांचा तपास घेण्याबाबत

**(२५) * ७४७६ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (जि.अहमदनगर) येथील श्रध्दास्थानातून माहे मार्च, २०१७ ते मार्च, २०२० या कालावधीत २७९ भाविक बेपत्ता झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाविक बेपत्ता होण्यास मानवी अथवा अवयव तस्करीचे रॅकेट कार्यरत आहे काय, याबाबत तपास करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी अहमदनगर पोलिसांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिर्डीतून बेपत्ता होणाऱ्या भाविकांचा तपास घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) शिर्डी येथून बेपत्ता झालेल्या व्यक्तींमधील सर्वच भाविक नसून शिर्डी पोलीस स्टेशन हद्दीतील स्थानिक महिला/पुरुष देखील आहेत. मार्च, २०१७ ते मार्च, २०२० या कालावधीत शिर्डी पोलीस स्टेशन येथे दाखल एकूण २७९ बेपत्ता व्यक्तींपैकी २४४ महिला/पुरुष मिळून आलेले आहेत. उर्वरीत बेपत्ता व्यक्तींचा शोध सुरु आहे.

(२) होय.

(३) बेपत्ता झालेल्या व्यक्तींबाबत आजूबाजूच्या परिसरात, रेल्वे स्टेशन, बस स्टँड ठिकाणी बेपत्ता व्यक्तीचा फोटो चिटकवणे, मोबाईल नंबरचे सीडीआर व एसडीआर काढून त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच बेपत्ता व्यक्तीचे शोध कामी स्वतंत्र पथकाची नियुक्ती करण्यात येते. अहमदनगर जिल्हयात बेपत्ता व्यक्तीचा शोध घेणे कामी ऑपरेशन मुस्कान राबविण्यात येत असून त्यासोबत लहान मुलांसह प्रौढ व्यक्तींचा सुध्दा शोध घेतला जात आहे. शिर्डी येथून जानेवारी, २०१५ ते डिसेंबर, २०२० या कालावधीत बेपत्ता झालेल्या २२ व्यक्ती मिळून आल्या आहेत. तसेच मानवी तस्करी रोखण्यासाठी शिर्डी व अहमदनगरला दोन स्वतंत्र "मानवी तस्करी प्रतिबंधक पथक" स्थापन करण्यात आले आहे. शिर्डी साईबाबा मंदिर परिसरात बेपत्ता व्यक्ती मिळून येण्याकरीता तसेच भाविकांना मदत करणेकरीता तिर्थक्षेत्र/पर्यटन पोलीस चौकी चालू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यातील पोलिसांना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ देण्याबाबत

**(२६) * ७१४० डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिसांच्या कामाचे स्वरूप लक्षात घेता त्यांच्यासाठी वार्षिक आरोग्य तपासणी गरजेची असल्याने त्यांच्या वैद्यकीय तपासणीसाठी रुपये अडीच हजार देण्याचा तसेच शासकीय सेवेतून निवृत्तीनंतर महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, सदरहू प्रस्तावाच्या अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रस्तावाच्या अंमलबजावणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जापर्यंतच्या सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या कार्यवाहीधीन आहे. तसेच राज्य पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी (भापोसे वगळून) यांची वार्षिक वैद्यकीय तपासणी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. उक्त प्रस्तावामध्ये एकूण १२ वैद्यकीय तपासण्या प्रस्तावित आहेत. यावरील पुढील कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आरे दूध वितरकांच्या विविध मागण्यांबाबत

**(२७) * ६८३५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: मुंबई शहरातील वरळी व आरे डेअरी येथील दूध वितरकांच्या विविध मागण्यांसंदर्भात मा.दुग्धविकास राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बैठकीत आरे दूध वितरण केंद्र धारकांना दूध विक्रीपासून मिळणारे उत्पन्न अल्प असल्याने दूधाबरोबरच अन्य खाद्यपदार्थ रॉयल्टी तत्वावर विक्री करण्याच्या मागणीसह कामगार वसाहतीमधील दूध वितरक कर्मचाऱ्यांच्या वसाहती दुरुस्त करणे, सेवानिवृत्त कामगारांची प्रलंबित देणी, निवृत्तिवेतन, भविष्य निर्वाह निधी तसेच सेवानिवृत्ती लाभाची रक्कम देण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार असल्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, लातूर व अन्य शहरातील असलेल्या सर्व दूध वितरण केंद्र धारकांनाही या निर्णयाचा लाभ देण्यात येणार आहे काय, सदर निर्णयानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील आरे दूध वितरकांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) व (२) होय.
(३) यासंदर्भात आयुक्त दुग्धव्यवसाय विकास कार्यालय यांच्यास्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचे अनुदान देण्याबाबत

**(२८) * ६३४८ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.गोपिचंद पडळकर : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ४८७५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सन २०१८-२०१९ च्या खरीप हंगामापासून राज्यात राबविण्यात आली असून केंद्र शासनाने सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे निश्चित केले, तसेच सदरहू योजना शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याच्यादृष्टीने सहाय्यभूत ठरणार असल्याने योजनेच्या माध्यमातून पीक व पशुधन याबरोबरच फळबागेच्या रुपाने शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्तोत्र उपलब्ध होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३१ मार्च, २०२० अखेरचा निधी शासनाने वितरित न केल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेच्या अनुदानापासून वंचित राहावे लागले असून अनुसूचित जाती प्रवर्गाचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास विनंती करण्यात येवूनही निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचे अनुदान देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ मे, २०२० व दिनांक २९ ऑगस्ट, २०२० रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे करुनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचे अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आजतागायत रुपये ११५.२१ लाख अनुदान खर्ची पडले आहे.

(३) हे खरे नाही.

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी सन २०१८-२०१९ मधील तिसऱ्या हप्त्याचे व २०१९-२०२० मधील दुसऱ्या हप्त्याचे अनुज्ञेय होणारे अनुदान अदा करण्याकरीता दिनांक १७/०२/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये १२०.०० लाख एवढा निधी कृषी आयुक्तालयास वितरित करण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील अपघात रोखण्याबाबत

**(२९) * ७३५९ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात माहे जानेवारी ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीत ३१२ अपघात झाले असून त्यामधील ११७ अपघातात १२३ जणांचा मृत्यू झाल्याचे दिनांक ५ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे शहरातील अपघात रोखण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) पुणे शहर आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये जानेवारी, २०२० ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीत ४३१ अपघात झाले असून या अपघातांमध्ये १२४ नागरिकांचा मृत्यू झाला आहे.

(२) अपघात रोखण्यासाठी करण्यात येत असलेली कार्यवाही खालीलप्रमाणे

१) अपघात कमी होण्याकरीता पुणे वाहतूक शाखेकडून २३ ब्लॅकस्पॉट निश्चित करून संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करून प्राधान्यक्रम असलेली अल्पमुदतीची कामे करण्यात आली आहेत.

२) मा.सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या रस्ता सुरक्षा समितीने दिलेल्या सूचना सर्व संबंधित विभागांना दिल्या असून त्याची अंमलबजावणी होत आहे.

३) पुणे महानगरपालिका व पुणे वाहतूक शाखा पुणे यांच्यामार्फत नोव्हेंबर, २०२० पर्यंत विशेष मोहिम राबवून वाहतुकीस अडथळा ठरणारी ४०,१२७ अतिक्रमणे काढली आहेत.

४) सन २०२० मध्ये पुणे शहरातील महामार्गावर वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या ११६७४ वाहनांवर व वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या २२,४१,७४५ वाहन चालकांवर कारवाई केली आहे.

५) सन २०२० मध्ये मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या २०१७ वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे.

६) पुणे शहर वाहतूक शाखेकडून अपघात रोखण्यासाठी नवीन सिग्नल यंत्रणा, थ्रीडी झेब्रा क्रॉसींग, डिजीटल बोर्डव्दारे जनजागृती, पेट्रोलींग व्हेईकल, साईनबोर्ड, ड्रोन वगैरे अत्याधुनिक साधनसामुग्री मिळणेबाबत पुणे महानगरपालिका यांना प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वालीव (ता.वसई, जि.पालघर) येथील शासकीय जागेत भूमाफियांनी अवैधरित्या उत्खनन केल्याबाबत

**(३०) * ६४३३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वालीव (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्व्हे नं. २६ मधील शासकीय गुरचरण जागेत भूमाफियांनी दगडखाणीचा डोंगर पाच दिवसात फोडून अवैधरित्या दगड-माती चोरुन रस्ता बनविल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महसूल विभागाकडे स्थानिकांनी तक्रार करुनही शासनाने कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय जागेत डोंगर पोखरुन अवैधरित्या दगड-माती चोरी केल्याप्रकरणी भूमाफियांवर तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या महसूल प्रशासनाच्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) मौजे वालीव, ता.वसई येथील स.नं. २६ मधील शासनाच्या जागेत डोंगर पोखरुन रस्ता तयार केल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यानुषंगाने तहसिलदार, वसई यांनी याबाबत चौकशी करुन अनधिकृतपणे तयार करण्यात आलेला रस्ता जे.सी.बी.च्या सहाय्याने खोदून व मोठमोठे दगड टाकून बंद करण्यात आला आहे. तसेच याबाबत वालीव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोरेगाव (जि.सातारा) येथे क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(३१) * ६५५६ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ६१०९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगाव (जि.सातारा) येथे क्रीडा विषयक पायाभूत सुविधांचा अभाव असून तालुक्यातील अनेक उद्योन्मुंख खेळाडूंनी विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धामध्ये भाग घेऊन देशाचे, राज्याचे तसेच जिल्हा व तालुक्याचा क्रीडा क्षेत्रात नावलौकिक वाढविला असल्याचे अनेक स्पर्धामधून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका क्रीडा संकुल कोरेगावकरीता जागा व निधी उपलब्ध नसल्यामुळे तालुक्यातील होतकरु खेळाडूंची क्रीडा संकुलाअभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तालुका क्रीडा संकुल, कोरेगावकरीता जागा व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) अंशत: खरे आहे.

कोरेगांव तालुक्यातील विविध खेळाडूंनी क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून देशाचा, राज्याचा, जिल्ह्याचा व तालुक्याचा नावलौकिक वाढविला आहे.

(२) नाही.

(३) तालुका क्रीडा संकुल, कोरेगाव यासाठी जागा प्राप्त करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. जागा प्राप्त झाल्यावर निधी उपलब्धतेबाबत कार्यवाही करण्याचे नियोजन आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील वाळू चोरी रोखण्याबाबत

**(३२) * ७२१५ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील हट्टा मंडळातील नदी घाटातील वाळूगटांचे लिलाव झाले नसल्याने नदी घाटावर वाळूची चोरी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी संबंधित जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे नदी घाटाचे लिलाव न झाल्याने शासनाचा महसूल बुडाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हिंगोली जिल्ह्यातील नदी घाटाचे लिलाव करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, यासाठी किती कालावधी लागणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) व (३) हिंगोली जिल्ह्यात सन २०२०-२०२१ मध्ये शासनाच्या सुधारित वाळू/रेती निर्गती धोरणानुसार ३२ वाळू गट निश्चित करण्यात येऊन त्यांना जिल्हास्तरीय समितीची मंजूरी घेण्यात येऊन खाणकाम आराखडा तयार

करण्यात येऊन जनसुनावणी घेण्यात आली. पर्यावरण विभागाने ३१ वाळूगटांच्या लिलावास परवानगी दिली असून प्रथम फेरीत ७ वाळूगटांस लिलाव यशस्वी झाला असून उर्वरित वाळूगटांचा दुसऱ्या फेरीच्या लिलावाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नालासोपारा (ता.विरार, जि.पालघर) पश्चिम परिसरात विकासकांनी सदनिकाधारकांची फसवणूक केल्याबाबत

**(३३) * ७५३८ श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नालासोपारा (ता.विरार, जि.पालघर) पश्चिम परिसरात दोन विकासकांनी सदनिका विकण्याचे कामात २७ नागरिकांची फसवणूक केल्याची घटना दिनांक १८ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदनिका विकत घेण्याचे कामात फसवणूक झालेल्या २७ नागरिकांनी तसेच नालासोपारा (पश्चिम) छेडानगर परिसरात साई नित्य अपार्टमेंटमध्ये भायखळा, मुंबई येथील रहिवासी श्री.रामचंद्र अंकुश परब यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात फसवणूक झाल्याची तक्रार देवून याबाबतचा गुन्ह्यांची नोंद केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी विकासकावर कारवाई करुन फसवणूक झालेल्या सदनिकाधारकांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.
(२) होय.

(३) सदर प्रकरणी दिनांक १५/०१/२०२१ रोजी नालासोपारा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१५/२०२१ नुसार भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ३४ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ मधील कलम ३, ४ प्रमाणे व सदनिका मालकी हक्क अधिनियम १९६६ मधील कलम ३, ४ व ८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिकरोड (जि.नाशिक) येथे मुलीवर सामूहिक बलात्कार झाल्याबाबत

**(३४) * ७८९४ श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिकरोड (जि.नाशिक) येथे एका अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत पीडित मुलीच्या आईने नाशिकरोड पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी आरोपीवर कारवाई करुन पीडित मुलीला मदत व न्याय मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी सात आरोपींविरूध्द नाशिकरोड पोलीस ठाणे येथे भा.दं.वि.सं. कलम ३७६(डी ए), १०९ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ६, १६, १७ अन्वये गु.र.क्र. ११/२०२१ असा गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणी सहा आरोपीस अटक करण्यात आली असून, एक विधिसंघर्षित बालकास ताब्यात घेण्यात आले आहे. सदर प्रकरणातील विधिसंघर्षित बालकाविरूध्द मा.अध्यक्ष, बालन्यायमंडळ, नाशिक यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, उर्वरीत सहा आरोपींविरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सदर प्रकरणातील पिडितेस मनोधैर्य योजनेंतर्गत सहाय्य देण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पडघा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे मांगूर माश्यांची बेकायदेशीररित्या पैदास केली जात असल्याबाबत

**(३५) * ६८२९ श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक १६४३ ला दिनांक १२ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पडघा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील १५ तलावांमध्ये पर्यावरणाला घातक आणि केंद्रीय लवादाने उत्पादनास बंदी घातलेल्या मांगूर माश्यांची बेकायदेशीररित्या पैदास केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मत्स्यव्यवसाय विभागाने मांगूर मासे जप्त केले असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मांगूर माश्यांची बेकायदेशीररित्या पैदास व विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मा.हरित लवाद, नवी दिल्ली यांनी दिनांक २२/०१/२०१९ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली गठीत केलेल्या संयुक्त पथकाव्दारे कुंभारशीव (पडघा), ता.भिवंडी, जि.ठाणे येथील २६ मत्स्यसंवर्धकांस सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, ठाणे-पालघर कार्यालयाने अनधिकृत प्रतिबंधित मांगूर मत्स्यसाठा नष्ट करण्याबाबत नोटीशीव्दारे

कळविण्यात आले आहे. यापैकी ५ मत्स्यसंवर्धकांचे ३२ तलावांतील १०.११० टन एवढा अनधिकृत प्रतिबंधित मांगूर मत्स्यसाठा शास्त्रोक्त पध्दतीने नष्ट केला असून संबंधितांवर पोलीस स्थानकात FIR दाखल करण्यात आली आहे व उर्वरित मत्स्यसंवर्धकांवर प्रतिबंधित मांगूर माश्यांचा साठा नष्ट करण्याबाबत कार्यवाही करण्याचे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर व गोंदिया येथील नायलॉन मांजा विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३६) * ७३४१ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक : तारांकित प्रश्न क्रमांक १७०४ ला दिनांक ५ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नागपूर व गोंदिया येथे नायलॉन मांज्याला बंदी असतानाही प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे बेकायदेशीररित्या नायलॉनच्या मांज्याचा सर्रास वापर होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नायलॉन मांज्यामुळे नागपूर व गोंदिया जिल्ह्यातील नागरिक व पक्ष्यांना प्राण गमवावे लागले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नायलॉन मांजा विक्रेत्यांवर शुल्लक कारवाई होत असल्याने मांजा विक्री बेकायदेशीररित्या सर्रास सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदेशीररित्या नायलॉनच्या मांज्याची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) नागपूर शहर येथे नायलॉन मांज्याचा वापर व विक्री करणाऱ्यांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. नागपूर ग्रामीण येथे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०२० मध्ये तसेच माहे जानेवारी, २०२१ मध्ये नायलॉन मांजा दुकानात विक्रीस ठेवल्याची माहिती मिळताच कार्यवाही करण्यात आली आहे. गोंदिया येथे कोणतीही तक्रार दाखल नाही.

(२) नागपूर शहर येथे माहे नोव्हेंबर, २०२० ते माहे जानेवारी, २०२१ या कालावधीत मांजा गळ्यात अडकुन एक मृत्यू प्रकरणात गुन्हा दाखल आहे तसेच एक व्यक्ती जखमी बाबत नोंद आहे.

गोंदिया जिल्ह्याची माहिती निरंक आहे.

(३) व (४) नागपूर शहर नायलॉन मांज्या विक्रेत्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. एकूण ५४ गुन्हे दाखल असून ५५ आरोपी निष्पन्न झाले आहेत.

नागपूर ग्रामीण मध्ये ४ गुन्हे दाखल असून २ गुन्ह्यात दोषारोपपत्र न्यायालयात दाखल व २ गुन्हे तपासावर आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत

**(३७) * ६५१७ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १० मधील प्रश्न क्रमांक ६०९८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळंदी-पंढरपूर-मोहोळ राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९६५ च्या माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यात भूसंपादनामध्ये झालेल्या चुकीमुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून माळशिरस नगरपंचायत हद्दीमधील भूसंपादन निवाड्यामध्ये प्रत्येक गटाला वेगवेगळा बाजार भाव धरुन चुकीचा निवाडा केला गेला आहे, त्यामध्ये काही गटांना प्रति चौ.मी. रुपये ५५१ धरुन गुणांक

१ लावून २ पट मोबदला प्रती गुंठा रुपये १,१०,२०० देऊन चुकीचा निवाडा मंजूर केला आहे, तर मौजे येळीव (ता.माळशिरस) या गावाचा भूसंपादन निवाडा मंजूर करत असताना त्या गावातील जमिनीचा बाजार भाव प्रति चौ.मी. रुपये ९४० धरुन गुणांक २ लावून ४ पट मोबदला देऊन प्रती गुंठा रुपये ३,७६,०००/- निवडा मंजूर केला असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माळशिरस मधील शेतकऱ्यांच्या जमिनीला ग्रामपंचायत क्षेत्रापेक्षा कमी बाजारभाव धरुन कवडीमोल मोबदला निश्चित केला आहे व भूसंपादन कायदा, २०१३ चे उल्लंघन करुन संबंधित अधिकाऱ्यांनी स्वतःची मनमानी करुन चुकीच्या निवाडा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माळशिरस तालुक्यातील शेतकऱ्यांचे चुकीच्या भूसंपादनामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे निवेदन व आंदोलन करून मागणी करुनही शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन माळशिरस येथील शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे नाही.

मौजे माळशिरस येथे नगरपंचायत असून खरेदी विक्री व्यवहाराचे आधारे सरासरीने निश्चित केलेला दर रुपये ५५१ प्रति चौ.मी. हा शीघ्रसिध्दगणकातील दरापेक्षा जास्त असल्याने निवाड्यात देय केलेला आहे व सदर निवाड्यास प्रकल्प संचालक यांनी मंजुरी दिली असून मोबदला रक्कम रुपये २८.२५ वाटप करण्यात आलेली आहे. तसेच मौजे येळीवमध्ये संपादित होणाऱ्या जमिनी महामार्गालगत असलेने महामार्गालगतच्या जमिनीचा शिघ्रसिध्दगणक दर रुपये ९४० प्रति चौ.मी. निवाड्यात देय करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

मौजे माळशिरस येथील निवाडा नवीन भूसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदींचा अवलंब करूनच तयार करणेत आला असून सदर निवाड्यास भूसंपादन मंडळ तथा NHAI ची मंजूरी प्राप्त आहे. सबब, या कामी कोणत्याही कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन झालेले नाही.

(३) सद्य:स्थितीत संबंधित जमिनींचे मालक शेतकरी यांनी मौजे माळशिरस मध्ये संपादित होणाऱ्या जमिनींच्या निवाड्या विरोधात राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ मधील कलम ३ (G)(५) अन्वये लवाद तथा अपर जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे एकूण ३८ अर्ज सादर केले असून सदर अर्जावर सुनावणी सुरू आहे.

(४) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ मधील कलम ३ (G)(५) अन्वये लवाद तथा अपर जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे प्राप्त अर्जावर सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, माळशिरस विभाग, अकलुज यांनी म्हणणे दिले असून सदर बाबींवर सुनावणी सुरू आहे. सबब, आज रोजी सदर बाब ही न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील शेततळ्याचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(३८) * ६६१६ श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.संजय दौंड, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात मागेल त्याला शेततळे योजनेंतर्गत सन २०१६-२०१७ ते सन २०१९-२०२० या कालावधीत ३ हजार ५१९ शेततळ्यांची कामे पूर्ण झाली असून त्यापैकी ३ हजार २७२ शेततळ्यांच्या कामाचे रुपये १५ कोटी ५६ लाख २५ हजारांचे अनुदान लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले असून उर्वरित २४७ शेततळ्यांचे अनुदान लाभार्थ्यांना मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शेततळ्याचे प्रलंबित असलेले अनुदान लाभार्थ्यांना त्वरीत देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना शेततळ्याचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे.
(३) अनुदान उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील होमगार्डांचे प्रलंबित मानधन व कोरोना काळातील सेवेचा विशेष भत्ता देण्याबाबत

**(३९) * ७२५८ श्री.प्रशांत परिचारक, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक ४९२ ला दिनांक ५ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ३३३ हजार होमगार्ड मानधनाविनाच काम करत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यःस्थितीत राज्यात अंदाजे ४५७२७ होमगार्ड असून त्यांचा बंदोबस्तासाठी व कोरोना काळातील उपाययोजनांसाठी मदत घेतली जाते मात्र त्यांना कोणताही विशेष भत्ता मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन होमगार्ड यांना त्यांचे प्रलंबित मानधन व कोरोना काळातील सेवेचा विशेष भत्ता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) नाही.
(२) बंदोबस्तासाठी व कोरोना काळातील उपाययोजनांसाठी होमगार्डची मदत घेतली जाते. त्यांनी केलेल्या कर्तव्यासाठी त्यांना शासनाने प्रतिदिन प्रमाणे ठरवून दिलेले मानधन दिले जाते. त्याव्यतिरिक्त त्यांना कोणताही विशेष भत्ता दिला जात नाही. तथापी, होमगार्ड यांना कोविड-१९ संबंधित कर्तव्य बजावताना कोविडमुळे मृत्यू झाल्यास विमा कवच/सानुग्रह सहाय्य लागू करण्यात आले आहे.
(३) व (४) सन २०२०-२०२१ मध्ये माहे ऑक्टोबर, २०२० या कालावधीपर्यंत होमगार्डचे वेतन अदा करण्यात आले आहे. आतापर्यंत होमगार्ड मानधनासाठी सुमारे २१५ कोटी एवढा निधी वितरित करण्यात आला असून यापुढे निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे तो मानधनासाठी वितरित करण्यात येईल.

-----------------

## राज्यात मच्छीमारांच्या डिझेल परताव्याची थकित रक्कम अदा करण्याबाबत

**(४०) * ७०५४ श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, श्री.सुरेश धस, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुंबई, मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या सात जिल्हयातून प्रामुख्याने मोठ्या प्रमाणावर मासेमारी व्यवसाय केला जात असून राज्यातील आर्थिक संकटात असलेल्या लाखो मच्छीमारांना डिझेल परताव्याची सुमारे रुपये २३० कोटींची थकबाकी शासनाकडे प्रलंबित असताना मत्स्यव्यवसाय आयुक्तांनी प्रत्येक मच्छीमारांना मासेमारी करण्यासाठी देण्यात येणारा डिझेल कोटा कमी करुन १७५० लिटर देण्याचे आदेश काढल्यामुळे राज्यातील मच्छीमार आर्थिक संकटात सापडला असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणातील सात जिल्हयात मोठ्या प्रमाणावर समुद्री मासेमारी व्यवसाय केला जात असून या मच्छीमार व्यवसायावर सुमारे पंधरा लाख कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो, सदरहू मच्छीमारांना यापूर्वी खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या यांत्रिक नौकेसाठी सहा महिन्यांपर्यंत चार हजार लिटर्सपर्यंत डिझेल कोटा मंजूर करण्यात येत होता, परंतु, उपरोक्त जिल्हयातील १६० मच्छीमार संस्थाच्या ९६४६ मासेमारी करणाऱ्या यांत्रिक नौकासाठी दिनांक १ ते १५ जानेवारी दरम्यान १५ दिवसासाठी १७५० लिटर्स डिझेल देण्याचे आदेश मत्स्यव्यवसाय आयुक्त, श्री.अतुल पाटणे यांनी काढल्यामुळे नवीन आदेशाप्रमाणे देण्यात येणारा १७५० लिटर्स डिझेल कोटा एका ट्रिपसाठी अत्यंत अपुरा पडत असून मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांना खोल समुद्रात २० ते २५ दिवसांची ट्रिप करावी लागत असल्यामुळे मच्छीमारांवर बाहेरुन जादा दराने डिझेल खरेदी करण्याची वेळ आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मच्छीमारांना डिझेल परताव्याची सुमारे रुपये २३० कोटींची थकबाकी प्रलंबित राहण्याची तसेच मच्छीमारांकरीता देण्यात येणारा डिझेल कोटा कमी करण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच, मच्छीमारांची डिझेल परताव्याची थकित रक्कम रुपये २३० कोटी मच्छीमारांना अदा करुन डिझेल कोटा पूर्वीप्रमाणे १५ दिवसांसाठी चार हजार लिटर्स देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी व मच्छीमारांनी माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

दिनांक ०१ जानेवारी, २०२१ ते ३१ मार्च, २०२१ या तीन महिन्याच्या कालावधीकरीता ३०% डिझेल कोटा मंजूर करण्याकरीता आवश्यक माहिती प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयामार्फत अप्राप्त असल्यामुळे दिनांक ०१/०१/२०२१ रोजीच्या डिझेल कोटा समितीच्या

बैठकीमध्ये मासेमारी नौकांना तीन महिन्याकरीता ३०% डिझेल कोटा मंजूर करणे माहिती अभावी शक्य झाले नाही. उक्त माहिती अप्राप्त असतानासुध्दा मच्छीमारांची गैरसोय होऊ नये तसेच त्यांचे नुकसान होऊ नये याकरीता दिनांक ०१ जानेवारी, २०२१ ते १५ जानेवारी, २०२१ (१५ दिवसांसाठी) ५ टक्के डिझेल कोटा मंजूर करण्यात आलेला होता. तद्नंतर प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयामार्फत दिनांक ११/०१/२०२१ रोजी माहिती प्राप्त झाल्यावर दिनांक १३/०१/२०२१ रोजी डिझेल कोटा समितीची बैठक आयोजित करुन पात्र मच्छीमार नौकांना दिनांक १६/०१/२०२१ ते ३१/०३/२०२१ या कालावधीकरीता २५% डिझेल कोटा मंजूर करण्यात आलेला आहे.

(३) डिझेल परताव्यासाठी दरवर्षी अर्थसंकल्पीत असलेला निधी व डिझेल परताव्याची मागणी यातील तफावतीमुळे डिझेल परताव्याची रक्कम प्रलंबित आहे.

प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयाकडून महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ च्या तरतूदीचे उल्लंघन केलेल्या नौकांचे दाखल प्रतिवेदने, परवाने निलंबित अथवा रद्द याबाबतची माहिती अप्राप्त असल्यामुळे मच्छीमारांची गैरसोय होऊ नये याकरीता दिनांक ०१ जानेवारी, २०२१ ते १५ जानेवारी, २०२१ (१५ दिवसांसाठी) ५ टक्के डिझेल कोटा मंजूर करण्यात आलेला आहे. डिझेल कोटा १५ दिवसांकरीता मंजूर करण्याबाबतचा निर्णय हा तात्पुरत्या स्वरूपात डिझेल कोटा समितीने घेतला होता. परंतु तद्नंतर माहिती प्राप्त झाल्यानंतर पात्र नौकांना निकषानुसार उर्वरीत कालावधीसाठी डिझेल कोटा मंजूर करण्यात आलेला आहे.

(४) हे खरे आहे.

(५) सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात डिझेल परताव्यासाठी अर्थसंकल्पीत असलेला संपूर्ण निधी (रुपये ६०.०० कोटी) वितरित केला असून उर्वरीत थकीत रक्कम प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता पात्र यांत्रिक नौकांसाठी १००% डिझेल कोटा मंजूर करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील वाळू चोरी रोखण्याबाबत

**(४१) * ६७१५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील उमरी बाजार परिसरात रामपूर पाथरी, भामपूर, खंबाळा, पाडी या गावानजिक पैनगंगा नदी घाटावरुन अवैधरित्या बेसुमार रेती चोरी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रेती घाटाचा मागील अनेक वर्षापासून लिलाव झालेला नसल्याने रेतीमाफिया याचा फायदा घेऊन सर्रास अवैधरित्या रेती उपसा करीत असल्याने शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदेड जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील तसेच परराज्यातील काही व्यक्ती वाळू चोरीमध्ये सक्रिय असून वाळू चोरीच्या चौकशीसाठी बाहेरील जिल्ह्यातील अधिकारी नेमण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैधरित्या रेती उत्खनन करणाऱ्या रेतीमाफिया व त्यांना सहकार्य करणाऱ्या महसूल अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन नांदेड जिल्ह्यातील वाळू चोरी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात पोलिसांसाठी निवासस्थाने बांधण्याबाबत

**(४२) * ६६४२ श्री.विलास पोतनीस, श्री.महादेव जानकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.मोहनराव कदम : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ५३३९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोलिसांच्या नोकरीच्या ठिकाणी पोलिसांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी चांगल्या सोयी-सुविधांनी युक्त जास्तीत जास्त निवासस्थाने बांधण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास प्रशासनास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार शासनाने याबाबतचा प्रस्ताव तयार केला आहे काय, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, सदरहू प्रस्तावाच्या अंमलबजावणीसाठी किती रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात पोलिसांसाठी निवासस्थाने बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) I. शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक ०३/०२/२०२१ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीमध्ये विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ च्या विनियम ३३ (३)(ब) अंतर्गत खाजगी विकासकांमार्फत स्वत:च्या जमिनीवर पोलिसांसाठी गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यास चालना देण्याच्या दृष्टीने प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना मंजुरी देतेवेळी उपभोक्ता/ वापरकर्ता विभाग यांची ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याची पध्दत सुरळीत करण्याकरीता पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व

कल्याण महामंडळ मर्या., मुंबई यांची त्रिसदस्य प्रकल्पपूर्व मान्यता समिती गठित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर समितीची पूर्वमान्यता/ ना-हरकत प्राप्त झाल्यास अशा प्रकल्पांना गृह विभागाची वेगळी ना-हरकत घेण्याची गरज राहणार नाही.

II. शासन निर्णय दिनांक ०३/०२/२०२१ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीमध्ये विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ च्या विनियम ३३ (३)(अ) च्या अनुषंगाने पोलीस विभागाच्या अधिपत्याखालील जमिनीवर पोलीस गृहनिर्माणकरीता महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांना अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नेमण्यात आले आहे तसेच त्यांनाच अशा प्रकल्पांसाठी विकासक म्हणून घोषित करण्यात आले आहे.

III. पोलिसांसाठी दर्जेदार घरे उपलब्ध व्हावीत यासाठी पोलीस गृहनिर्माणाचे स्पेसिफिकेशन व मानके यांचा अंतर्भाव असलेले एसओपी (S.O.P.) तयार करण्याबाबत व त्यास शासनाची मंजुरी घेणेबाबत महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., मुंबई यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यात अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४३) * ७१८९ श्री.विनायकराव मेटे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १० मधील प्रश्न क्रमांक ५६९७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदफणा व गेवराई (जि.बीड) तालुक्यातील गोदावरी नदी परिसरातील गावातून वाळू माफीया अवैधरित्या वाळूचा उपसा करुन शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवित असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत गावकऱ्यांनी, विविध संघटनांनी या विरोधात रस्ता रोको, मोर्चे व तीव्र आंदोलने करुनही शासनाने वाळू माफीया विरोधात कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तलाठी, मंडळ अधिकारी, पोलीस प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी यांच्या आर्थिक संगनमताने वाळू माफीया चोरी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बीड जिल्हयात अवैध वाळू उपसा करुन शासनाचा महसूल बुडविणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी तहसिलस्तरावर भरारी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकामार्फत गेवराई तालुक्यात माहे एप्रिल, २०२० ते जानेवारी, २०२१ अखेर एकूण ४३ प्रकरणावर रुपये ७६,१५,५७७/- एवढी दंडात्मक कारवाई करुन शासनजमा करण्यात आलेली आहे. तसेच गेवराई तालुक्यातील ५३३ ब्रास जप्त केलेला वाळूसाठ्याच्या लिलाव करुन त्यापासून रुपये १३,२९,०४१/- एवढा महसूल शासनास प्राप्त झाला आहे.

माहे एप्रिल, २०२० ते जानेवारी, २०२१ या कालावधीत बीड तालुक्यातील गौण खनिजच्या अवैध उत्खननाच्या ११ प्रकरणात रुपये १८,१२,५६०/- एवढी दंडात्मक कारवाई करुन शासनजमा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: कुर्डुवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील ई-सेवा केंद्रामार्फत दाखले मिळत नसल्याबाबत

**(४४) * ६५९५ श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: कुर्डुवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील ई-सेवा केंद्रामार्फत दाखले व इतर अनुषंगिक दाखले मिळण्यात अडचणी येत असून जातीचे दाखले, ७/१२ उतारे, नकाशे इत्यादी गोष्टी वेळेवर दिल्या जात नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुर्डुवाडी सेवा केंद्राकडे आवश्यक कागदपत्रे सादर करुनही तेथील खाजगी संगणक चालक नागरिकांशी अरेरावी करुन नागरिकांची अडवणुक करीत असून दाखले देण्याचे काम आर्थिक गैरव्यवहार करुनच करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कुर्डुवाडी सेवा केंद्राच्या गैरकारभाराची स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कुर्डुवाडी सेतू केंद्राची मान्यता रद्द करुन नागरिकांची अडवणुक व आर्थिक फसवणूक करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) मौ.कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर येथील महा ई-सेवा केंद्राच्या गैरकारभाराबाबत शासनाकडे कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. तथापि, श्री.अक्षय अशोक खारे, जिल्हा संघटक, कृषी पदवीधर युवा शक्ती संघटना यांनी मौ. कुर्डुवाडी येथील ज्योती मोहन लोकरे-कन्हेरे, महा ई-सेवा केंद्र यांच्या विरूध्द दिनांक २९/०१/२०२१ रोजी उपविभागीय अधिकारी, माढा विभाग, जि.सोलापूर यांचेकडे तक्रार अर्ज दिलेला आहे.

(४) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने तहसिलदार (महसूल), माढा, जि.सोलापूर यांनी संबंधित महा ई-सेवा केंद्राची तपासणी केली असता उक्त तक्रार अर्जामध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुसद (जि.यवतमाळ) शहर व परिसरामध्ये भूमाफियांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत

**(४५) * ७२९५ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुसद (जि.यवतमाळ) शहर व परिसरामध्ये भूमाफियांनी पाणंद रस्ते, वन विभाग, सिंचन विभागाच्या शासकीय जमिनीवर अतिक्रमण केल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकारणी शासनाने चौकशी करुन पुसद शहर व परिसरामध्ये भूमाफियांकडून शासकीय जमिनीवर करण्यात आलेले अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत तसेच भूमाफियांना सहकार्य करणाऱ्या शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) होय.
(२) व (३) उप अधीक्षक, भूमि अभिलेख, पुसद यांच्या कार्यालयाकडून मौजे पुसद खंड २, ता.पुसद येथील सर्व्हे नं. ४३/३, ४३/४,४३/५ व ४४/१ ची मोजणी करण्यात आली आहे. उप अधीक्षक, भूमि अभिलेख, पुसद यांच्या कार्यालयातील मूळ नकाशा व टिपण उतारा या अभिलेखामध्ये टिंबी पाणंद रस्त्याची नोंद असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अंतिम सीमांकन मोजणीकरीता प्रकरण प्राप्त झाल्यानंतर मोजणी करून “क” शिट पुरविण्यापुर्वी पांदण रस्त्याची दुरुस्ती करून मोजणी शिट पुरवण्यात येईल, असे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, पुसद यांनी त्यांच्या दिनांक १०/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, पुसद यांना कळविले आहे. सदर पांदण रस्त्याची नोंद अर्जदार यांच्या प्रस्तावित अकृषक ले आऊटचे नकाशात

घेतल्यानंतर अंतिम मंजूरी देण्याबाबत नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल. तसेच संबंधित भूमापकाकडून झालेल्या चुकीबाबत त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यासाठी उपसंचालक, भूमि अभिलेख, अमरावती विभाग, अमरावती यांना दिनांक २२/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये निर्देश देण्यात आलेले आहेत.

-----------------

## अकोलखेड (ता.अकोट, जि.अकोला) येथील नदीपात्रातील अवैध रेती उत्खनन रोखण्याबाबत

**(४६) * ६८८५ श्री.गोपिकिशन बाजोरीया : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १२ मधील प्रश्न क्रमांक ५८४४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोलखेड (ता.अकोट, जि.अकोला) येथील नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात बद्री रेतीचे अवैधरित्या उत्खनन होत असल्याची तक्रार नागरिकांनी जिल्हा प्रशासनाकडे व तहसिल प्रशासनाकडे वारंवार करुनही अवैध रेतीचे उत्खनन करणारे, या भागातील सर्कल व तलाठी यांच्यात आर्थिक संगनमत असल्यामुळे अवैध रेती उत्खननावर कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध उत्खनन करुन शासनाचा महसूल बुडविणाऱ्या रेती माफिया व त्यांना सहकार्य करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन अवैध रेती उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील अपघातग्रस्त शेतकऱ्यांना स्व.गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतून मदत देण्याबाबत

**(४७) * ६८४३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ५७६६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेती व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्याचा मृत्यू किंवा अपघात झाल्यास त्याच्या कुटुंबियास स्व.गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतून आर्थिक मदत देण्याबाबत शासन आदेश असतानाही परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा मृत्यू व अपघात होऊनही सदरील मदत देण्यात आली नसल्याने याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २० नोव्हेंबर, २०२० अखेरपर्यंत परभणी जिल्ह्यातील सन २०१७-२०१८, २०१८-२०१९ व २०१९-२०२० मध्ये एकूण १८८ विमा प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ९६ विमा प्रस्ताव मंजूर केले असून ३४ विमा प्रस्ताव नामंजूर केले आहे तसेच २५ प्रस्ताव कागदपत्रांच्या अभावी प्रलंबित असून ३३ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी जिल्ह्यातील अपघातग्रस्त शेतकरी व मृत शेतकरी यांच्या कुटुंबियांना उक्त योजनेतून आर्थिक मदत देण्याकरीता होत असलेल्या विलंबास कृषी विभागातील बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे काय, कारवाईची थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विमा कंपनीकडे कार्यवाहीत प्रलंबित असलेले प्रस्ताव मंजूर करुन परभणी जिल्ह्यातील अपघातग्रस्त शेतकरी व मृत शेतकरी यांच्या कुटुंबियांना स्व.गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतून मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

नोंव्हेबर, २०२० अखेरपर्यंत परभणी जिल्हयातील सन २०१७-२०१८, २०१८-२०१९ व २०१९-२०२० मध्ये एकूण १९८ विमा प्रस्ताव परभणी जिल्हयास प्राप्त झाले असून त्यापैकी १९० विमा प्रस्ताव विमा कंपनीकडे सादर करण्यात आलेले आहेत. त्यातील १०१ विमा प्रस्ताव मंजूर झाले असून ३९ विमा प्रस्ताव नामंजूर केले आहे आणि २५ विमा प्रस्ताव कागदपत्राअभावी प्रलंबित असून २२ विमा प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत.

तसेच दिनांक ०५/०२/२०२१ रोजीच्या अहवालानुसार परभणी जिल्हयातील सद्य:स्थिती खालीलप्रमाणे :-

| वर्ष | प्राप्त विमा प्रस्ताव | पुर्व सूचना प्राप्त प्रस्ताव | एकूण प्राप्त प्रस्ताव | मंजूर विमा प्रस्ताव | नामंजूर विमा प्रस्ताव | कंपनीकडे कार्यवाहीत | कागदपत्रा अभावी प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१७-१८ | ७९ | ० | ७९ | ४५ | ३२ | २ | ० |
| २०१८-१९ | ७५ | ० | ७५ | ४७ | ६ | १० | १२ |
| २०१९-२० | ३६ | २३ | ५९ | १६ | ३ | १० | ३० |
| एकूण | १९० | २३ | २१३ | १०८ | ४१ | २२ | ४२ |

(३) व (४) प्रलंबित विमा दाव्यांबाबत नियमितपणे प्रकरणनिहाय आढावा घेऊन कागदपत्रांची पुर्तता क्षेत्रियस्तरावरुन करुन घेण्याची कार्यवाही तसेच त्यानुषंगाने सातत्याने विमा कंपनीच्या कामकाजाचा नियमित आढावा घेऊन आवश्यक त्या कार्यवाहीचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

कृषी आयुक्तालय स्तरावरुन विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनी यांच्यावर नियंत्रण ठेऊन विमा प्रस्ताव निकाली काढण्यात येत आहे. परभणी जिल्हयातील अपघातग्रस्त शेतकरी व मृत शेतकरी यांच्या कुटुंबियांना उक्त योजनेतून आर्थिक मदत देण्याकरीता कृषी विभागाच्या स्तरावरुन तातडीची कार्यवाही सुरु आहे.

(५) सदर योजनेंतर्गत विमा प्रस्ताव हे शेतकरी कुटुंबाकडून आवश्यक असणाऱ्या कागदपत्राच्या पुर्ततेअभावी प्रलंबित राहतात. बहुतांशी प्रकरणामध्ये ७/१२, ६-क, ६-ड, व्हिसेरा अहवाल, पोलीस अंतिम अहवाल इत्यादी कारणांचे कागदपत्राअभावी विमा प्रकरणे प्रलंबित राहतात, असे निदर्शनास आलेले आहे.

-----------------

## बडनेरा (जि.अमरावती) येथील कोरोना तपासणी केंद्रामध्ये महिलेची चुकीच्या पध्दतीने कोरोना तपासणी केल्याबाबत

**(४८) * ७१८३ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बडनेरा (जि.अमरावती) येथील ट्रामा केअर युनिटमध्ये कोरोना तपासणी केंद्रातील प्रयोगशाळेमध्ये तेथील मॉलमधील कर्मचाऱ्यांसह महिला कर्मचाऱ्यांच्या कोरोना तपासण्या करण्यात आल्या असल्याचे दिनांक २८ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लॅबमधील अल्पेश नावाच्या कर्मचाऱ्याने एका महिलेची पहिल्यांदा नाकाव्दारे व दुसऱ्यांदा बेकायदेशीरपणे व आक्षेपार्हरित्या तिच्या गुप्तांगातून स्वॅब घेतल्याचा प्रकार दिनांक ३० जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास घडला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना तपासणी केंद्रातील संतापजनक प्रकाराबाबत तेथील नागरिकांनी आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस तपास करण्यात आला आहे काय, पोलीस तपासात काय निष्पन्न झाले आहे, त्यानुसार कोणती कारवाई केली आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) सदर घटनेबाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन बडनेरा येथे गु.र.नं. ४९०/२०२० कलम ३५४, ३७६ (c)(d), ३७६ (२)(e) भा.दं.वि. सह कलम ३(१)(w), ३(२)(५) अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक

कायदा सहकलम ६७ माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये आरोपीविरूध्द दिनांक २८/०७/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्यातील आरोपीला अटक करण्यात आली असून सध्या तो न्यायालयीन कोठडीत आहे. नमूद गुन्ह्याबाबतचे दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर करण्यात आले असून सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

तसेच कोरोना तपासणी केंद्रातील संतापजनक प्रकाराबाबत आंदोलनकर्त्यांनी नियमांचे उल्लंघन केल्या प्रकरणी पोलीस स्टेशन बडनेरा येथे अपराध क्र. ४९४/२०२० कलम ३५३, १८६, ४२७, ३४ भा.दं.वि. सह कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान अधिनियम अन्वये दिनांक ३०/०७/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील तीन ही आरोपीतांना अटकपुर्व जामीन मंजूर झाला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला असून तपासाअंती गुन्ह्यात आरोपींविरूध्द दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर करण्यात आले असून सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय कर्मचारी खेळाडूंना विशेष वेतनवाढ देण्याबाबत

**(४९) * ६३४९ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय नागरी सेवा कबड्डी स्पर्धेत किंवा अन्य स्पर्धात सांघिक व वैयक्तिक सहभागी होऊन विभागास व राज्याला पारितोषक/पदक/चषक/ बहुमान मिळवून देणाऱ्या शासकीय कर्मचारी खेळाडूंना विशेष वेतनवाढ देण्याबाबत राज्यातील खेळाडू व स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय, दिनांक ११ मे, १९८९ नुसार अतिप्राविण्य म्हणजे केवळ ॲथिलीट खेळ प्रकारात १ ते ३ पर्यंत विजय प्राप्त करणाऱ्यांना विशेष वेतनवाढ देय असून कबड्डी किंवा इतर क्रीडा प्रकारात फक्त प्रथम क्रमांकासाठी विशेष वेतनवाढ देय आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासन निर्णयात सुधारणा करुन केंद्रीय कर्मचारी कबड्डी (खेळाडू) यांना तसेच इतर राज्यात १ ते ३ पर्यंत क्रमांक मिळवणाऱ्या कर्मचाऱ्यांना विशेष वेतनवाढ देण्यात येते, त्याच धर्तीवर राज्यातील शासकीय कर्मचारी खेळाडूंना विशेष वेतनवाढ देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दिनांक ११ मे, १९८९ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करुन राज्यातील शासकीय कर्मचारी खेळाडूंना देय असलेली विशेष वेतनवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) याबाबत श्री.संदिप इंदूरकर व इतर खेळाडूंनी शासनाकडे निवेदन सादर केलेले आहेत.

(२), (३) व (४) राष्ट्रीय स्पर्धेत अतिप्राविण्य प्राप्त केल्यास राज्य शासकीय कर्मचारी खेळाडूंना एक वेतनवाढ व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत अतिप्राविण्य प्राप्त केल्यास दोन वेतनवाढीबाबत, वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ११ मे, १९८९ चे आदेश आहेत. खेळाडूंच्या विशेष वेतनवाढीच्या अनुषंगाने सदर विषयाचे कामकाज वित्त विभागाकडून क्रीडा विभागास प्राप्त झाले आहे. या अनुषंगाने क्रीडा विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरासह राज्यात ऑनलाईन खरेदी-विक्रीत फसवणूक झाल्याबाबत

**(५०) * ७३६१ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऑनलाईन खरेदी करणाऱ्या नागरिकांची फसवणूक होण्याच्या प्रकारात वाढ झाली असून गेल्या ११ महिन्यात पुणे शहरात अडीच हजार नागरिकांची ऑनलाईन खरेदी-विक्री करताना कोट्यवधी रुपयांची फसवणूक

झाली असल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे शहरासह राज्यात ऑनलाईन खरेदी-विक्रीतील फसवणूकीच्या गुन्ह्यांना प्रतिबंध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) सन २०२० मध्ये राज्यात एकूण २२७६ गुन्ह्यांची नोंद झाली आहे व पुणे शहरात ऑनलाईन खरेदी-विक्रीतून फसवणूक झाल्यावरून सन २०२० मध्ये एकूण १३७० तक्रारी दाखल झाल्या आहेत.
(२) सर्व प्रकारचे ऑनलाईन फ्रॉड रोखण्याकरीता महाराष्ट्र सायबर कार्यालयाकडून उपलब्ध सर्व आधुनिक संसाधने जसे प्रेस, टिव्ही चॅनल्स, युट्युब, ट्विटर, फेसबुक, वेबसाईटचा उपयोग करून जनजागृती करण्यात आली आहे. तसेच विविध जनजागृती शिबिरे भरवून आजतागायत ६४,२३४ नागरिकांना सायबर सुरक्षेबाबत जागृत केले आहे.

राज्यात सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी एकूण ४६ सायबर लॅब्स सुरु करण्यात आल्या त्यापैकी ४३ सायबर लॅब्सना सायबर पोलीस ठाणे म्हणून घोषित करण्यात आले आहे. या सर्व सायबर लॅब / सायबर पोलीस ठाणेना गुन्ह्याच्या तपासाकरीता अत्याधुनिक यंत्रसामुग्री (सॉफ्टवेअर व हार्डवेअर) Tools देण्यात आली आहे. राज्यातील सर्व पोलीस घटकातील अधिकारी व अंमलदार यांना सायबर गुन्ह्यांचे उकल करण्याच्या अनुषंगाने विविध प्रशिक्षण शिबिरातून प्रशिक्षण देण्यात आले आहे.

इलेक्ट्रोनिक मिडिया, सोशल मिडिया आणि दैनंदिन प्रेसनोटच्या माध्यमातून महाराष्ट्र सायबरकडून जनजागृती करण्यात आली. लॉकडाऊन व कोरोना (Covid-१९) या महामारीच्या काळात ऑनलाईन फसवणुकीच्या सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्याच्या उद्देशाने नागरिकांना मार्गदर्शन करून सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

फिशिंग, डेबिट/क्रेडिट कार्ड फ्रॉड, जॉब फ्रॉड, फेक वेबसाईट्स, ऑनलाईन शिक्षण, रॅन्समवेयर, मालवेयर, स्किमिंग अॅटॅक्स, टिकटॉक, अॅमेझॉन, ट्विटर, व्हॉट्सअॅप अशा विविध सायबर माध्यमातून वापरकर्ते सायबर विषयक गुन्ह्यांना बळी पडू शकतात म्हणून अशा विविध विषयांसंबंधी विशेष मार्गदर्शिका (अॅड्व्हायझरी) महाराष्ट्र सायबर कार्यालयाकडून समाज माध्यमातून सोशल मिडिया आणि प्रेसनोटव्दारे प्रसारित करून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोरेगाव (जि.सातारा) तालुका कृषी कार्यालयाकरीता पर्यायी इमारत उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५१) * ६५५७ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १० मधील प्रश्न क्रमांक ६११० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगाव (जि.सातारा) तालुका कृषी कार्यालयाच्या शासकीय इमारतीची दुरवस्था झाल्याने पावसाळ्यात इमारतीचे स्लॅब गळती होत असून कार्यालयीन अभिलेखांची सुरक्षितता राखणे गेल्या दोन वर्षापासून गैरसोयीचे झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार पर्यायी इमारत उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने कोरेगाव पंचायत समितीच्या ताब्यात असलेली सर्व्हे क्र. १०३ बचत भवनची इमारत तालुका कृषी अधिकारी, कोरेगाव कार्यालयास उपलब्ध करुन देणेबाबत कोरेगाव पंचायत समितीने ठराव मंजूर करुन जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरेगाव पंचायत समितीच्या सदर ठरावास सातारा जिल्हा परिषदेने मंजुरी दिली आहे काय, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोरेगाव तालुका कृषी कार्यालयाकरीता पर्यायी इमारत उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) जिल्हा परिषद, सातारा यांचेस्तरावर याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) पंचायत समिती कार्यालयाकडील बचत भवनाची इमारत तालुका कृषी अधिकारी, कोरेगाव कार्यालयाकरीता भाडे तत्वावर घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे, त्याचबरोबर शेती उत्पन्न बाजार समिती कोरेगाव यांचेकडे उपलब्ध असलेली शेतकरी भवन ही इमारत तालुका कृषी अधिकारी, कोरेगाव कार्यालयाकरीता भाडे तत्वावर घेण्याचे देखील प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील घरकुलाच्या लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५२) * ७४८७ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात मागील दोन वर्षापासून वाळू घाटांचा लिलाव न झाल्याने तालुक्यातील २५० ते ३०० घरकुलांची कामे वाळूअभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील दोन वर्षामध्ये वाळू घाटांचा लिलाव न होण्यामागची कारणे काय आहेत, तसेच घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू मागूनही मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन याप्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन कळमनुरी तालुक्यातील घरकुलाच्या लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) हिंगोली जिल्ह्यात सन २०१९-२०२० या वर्षामध्ये वाळूगटांना पर्यावरण अनुमती न मिळाल्यामुळे लिलाव करता आले नाहीत. तथापि, जिल्ह्यातील जप्त केलेला १२० ब्रास वाळूसाठा घरकुल लाभार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

हिंगोली जिल्ह्यात सन २०२०-२०२१ मध्ये शासनाच्या सुधारित वाळू/रेती निर्गती धोरणानुसार ३२ वाळू गट निश्चित करण्यात येऊन त्यांना जिल्हास्तरीय समितीची मंजूरी घेण्यात येऊन खाणकाम आराखडा तयार करण्यात येऊन जनसुनावणी घेण्यात आली. पर्यावरण विभागाने ३१ वाळूगटांच्या लिलावास परवानगी दिली असून प्रथम फेरीत ७ वाळूगटांस लिलाव यशस्वी झाला असून उर्वरित वाळूगटांचा दुसऱ्या फेरीच्या लिलावाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पोहरा (ता.लाखनी, जि.भंडारा) येथील शेतातील रस्ता बंद करण्याबाबत

**(५३) * ७३९२ डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोहरा (ता.लाखनी, जि.भंडारा) महिला शेतकरी कातांबाई भगवान बोडनकर यांच्या शेताशेजारी असलेल्या शेतकऱ्याने महिला शेतकऱ्याच्या शेतातून रस्ता बनविल्याने सदरहू रस्ता बंद करण्याबाबत राजस्व विभाग, तालुका प्रशासन, तहसिलदार, लाखनी, मंडळ अधिकारी, नायब तहसिलदार, तलाठी, सरपंच, तंटामुक्त अध्यक्ष यांचेकडे माहे मार्च, २०२० पासून अद्यापपर्यंत सातत्याने लेखी अर्जाव्दारे मागणी करुनही प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला शेतकऱ्याच्या शेतात रस्ता बनविल्याने महिला शेतकऱ्याचा शेतात ये-जा करण्याचा मार्ग बंद झाला असून उक्त प्रकरणी महिला शेतकरी यांना न्याय देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रशासनाकडे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निवेदन देवूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महिला शेतकऱ्याच्या शेताशेजारी बनविण्यात आलेला रस्ता बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) तहसिलदार लाखनी यांचे न्यायालयाने मामलतदार कोर्ट १९०६ अन्वये दिनांक २/०२/२०१५ रोजी आदेश पारित करण्यात आलेला असून सदर आदेशाविरुध्द गैरअर्जदार भगवान कनसु बोडणकर व कांताबाई भगवान बोडणकर रा.पोहरा यांनी उपविभागीय अधिकारी साकोली यांचे न्यायालयात अपील दाखल केली असता उपविभागीय अधिकारी साकोली यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे फेरतपासणीसाठी अर्ज सादर करण्याचे दिनांक १६/०१/२०१७ रोजी आदेश पारित करुन अर्जदाराचा पुनर्विलोकन अर्ज नस्तीबध्द केलेला आहे.

तसेच वादी अशोक हरिभाउ बोडणकर विरुध्द प्रतिवादी कांताबाई भगवान बोडणकर यांचा सदर बाबीचा वाद सद्य:स्थितीत मा.दिवाणी न्यायालयात सुरु असून सदर रस्ता वादाचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. यास्तव न्यायप्रविष्ट प्रकरणात तहसिलदार लाखनी यांना प्रकरणी पुढील आदेश करता येवू शकत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे-पानशेत रोड (ता.हवेली, जि.पुणे) येथील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत

**(५४) * ६५७४ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-पानशेत रोड (ता.हवेली, जि.पुणे) हद्दीमध्ये न्याती स्पा व्हिलास बांधकाम प्रकल्पात टेकड्या फोडून अनधिकृत बांधकामे करण्यात येत असल्याचे तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे उल्लंघन करुन बेकायदेशीरपणे परवानगीविना गौण खनिजाचे खोदकाम करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टेकड्यांवर व टेकड्यांच्या उतारावर झालेल्या अनधिकृत बांधकामांस संबंधित प्रशासनाच्या अधिकाऱ्यांचे सहकार्य असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागात उंच-सखल ठिकाणी चुकीच्या बांधकामामुळे शेजारील इमारतीच्या खालचा भाग पोखरुन कामे सुरु असल्याने बाजूच्या रहिवासी भागाला धोका निर्माण झाला असतानाही तहसिलदार, हवेली व संबंधित प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुणे-पानशेत रोडमधील अनधिकृत बांधकामे निष्कासित करणे व अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्याबाबत कार्यवाही करुन अनधिकृत बांधकामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंजनगाव ते दर्यापूर (जि.अमरावती) येथील रस्त्याच्या कामाकरीता क्षमतेपेक्षा अधिक गौणखनिजाची वाहतूक होत असल्याबाबत

**(५५) * ६७१८ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगांव ते दर्यापूर (जि.अमरावती) येथील रस्त्याच्या कामाकरीता वाहतूक करणाऱ्या ट्रकमधून नियमांचे उल्लघंन करुन क्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात गौणखनिजाची कंत्राटदारामार्फत वाहतूक करण्यात येत असल्याने उक्त रस्त्यावर गौणखनिज खाली करित असताना ट्रकची समोरची दोन्ही चाके वर जावून अपघात घडला असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या कामाकरीता कंत्राटदाराकडून क्षमतेपेक्षा अधिक गौणखनिजाची वाहतूक वेगाने होत असल्याने नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन क्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात गौणखनिजाची वाहतूक करणाऱ्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) अशी बाब नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# अंबरनाथ (जि.ठाणे) शहरातील ज्वेलर्स दुकानावर दरोडा टाकण्यात आल्याबाबत

**(५६) * ६८०६ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) शहराच्या पश्चिम विभागातील सर्वोदय नगरमध्ये भरदिवसा एका ज्वेलर्स दुकानावर सशस्त्र दरोडा टाकून सुमारे २५ तोळे सोने लंपास करण्यात आल्याची घटना दिनांक १० जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेत दरोडेखोरांनी प्रतिकार करणाऱ्या दुकानाच्या मालकासह तीन जणांना गोळीबार करुन जखमी केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंबरनाथसह राज्यात वाढत असलेल्या दरोड्या, चोऱ्या, लुटमार आदी घटनांना आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) या प्रकरणी चोरी करीत असताना आरोपींनी प्रतिकार करणाऱ्या दुकान मालकावर गोळी झाडून तसेच अन्य दोघांना चाकुने वार करुन जखमी केले.

(३) या प्रकरणी अंबरनाथ पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.५४/२०२१ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ३ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास चालू आहे. अशा प्रकारचे गुन्हे घडू नयेत याकरीता जनतेमध्ये जनजागृती करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक पोलीस ठाण्यातील बीट अधिकारी, अंमलदार तसेच गुन्हे शोध पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालण्यासाठी सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत. साध्या वेशातील पोलिसांची गस्त सुरु करण्यात आलेली आहे. तसेच नाकाबंदी लावून संशयित इसम व वाहनांची तपासणी करुन कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यातील महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५७) * ७२३६ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यातील महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत मृत व्यक्तींच्या नावाने बँक खाते उघडून कामे न करताच रुपये १०० कोटीच्या गैरव्यवहाराची चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी अहवालानुसार गैरव्यवहार प्रकरणी संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी दोषींवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यात सिलिंग व भोगवटादाराची अनामत रकमेचा भरणा न करता गैरप्रकारे विक्री केल्याबाबत

**(५८) * ७३०० डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात सिलिंग व भोगवटादार वर्ग-२ च्या अनामत रकमेचा भरणा न करता दर्यापूर उपविभागीय अधिकारी (एसडीओ) यांनी विक्री परवानगी दिल्याने शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडाल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरप्रकाराने विक्री परवानगी देऊन शासनाचा महसूल बुडविणाऱ्यांवर कारवाई करुन तसेच सदरहू महसूल वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) व (२) होय.

उपविभागीय अधिकारी, दर्यापूर, जि.अमरावती या कार्यालयाचे दफ्तर तपासणीवेळी फक्त सिलिंग जमिनीच्या विक्री परवानगीबाबतची १५ प्रकरणे आढळून आली. त्यापैकी ५ प्रकरणांमध्ये एकूण रुपये २५,१५,५१८/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली असून उर्वरित १० प्रकरणामध्ये रुपये ५२,५०,०२८/- इतकी रक्कम शासकीय खजिन्यात भरणा केली नसल्याचे निदर्शनास आले. चौकशीनंतर त्यापैकी एकूण २ प्रकरणामध्ये अर्जदाराकडून रुपये ३१,३७,५७५/- इतक्या रकमेची वसुली करुन चलनाव्दारे भरणा करण्यात आली आहे. उर्वरित ८ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये २१,१२,४५३/- इतक्या रकमेच्या वसुलीची कार्यवाही करण्यात येत असून तत्कालीन उपविभागीय अधिकारी, दर्यापूर यांना दिनांक २१/०१/२०२१ रोजी कारणे दाखवा नोटीस काढण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गाझीपुर (ता.अकोट, जि.अकोला) येथे अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन केल्याबाबत

**(५९) * ७०११ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गाझीपुर (ता.अकोट, जि.अकोला) येथील सर्व्हे नं. ३८ व २७ मध्ये अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भागातील अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर चौकशी अन्वये जमीन मालकांनी अवैधरित्या गौण खनिजचे उत्खनन करुन शासनाची रॉयल्टी बुडवून शासनाचे नुकसान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाची रॉयल्टी बुडविल्यासंदर्भात संबंधितांवर दंडात्मक/फौजदारी स्वरुपाची कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) वरिष्ठ उपसंचालक भूविज्ञान संचालनालय, नागपूर यांच्या पथकाने स. नं. ३८ व २७ मध्ये इटीएस प्रणालीव्दारे मोजणी केली असता मंजूर परिमाणापेक्षा जास्त उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यानुसार तत्कालीन तहसिलदार यांनी दिनांक १०/०९/२०२० रोजीच्या आदेशान्वये रुपये ६४,६२,३५,२००/- एवढया दंडात्मक रकमेचे आदेश पारित केले व त्याबाबत संबंधिताच्या स्थावर मालमत्तेवर बोजा चढविण्यात आला आहे.

तहसिलदार, अकोट यांचे दिनांक १०/०९/२०२० रोजीच्या आदेशाविरुध्द संबंधितांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका दाखल केली असून त्यावर मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७/११/२०२० रोजीच्या आदेशान्वये प्रकरण अंतिम निकालासाठी ठेवून तोपर्यंत अपिलार्थी विरुध्द सक्तीचे पाऊल उचलू नये असे आदेश पारित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लालबाग (मुंबई) येथील साराभाई इमारतीत सिलेंडरच्या स्फोटात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना मदत देण्याबाबत

**(६०) * ७४५५ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लालबाग (मुंबई) येथील साराभाई इमारतीतील एका घरामध्ये सिलेंडरचा स्फोट होऊन त्यामध्ये दहा जणांचा मृत्यू व अन्य १४ जण गंभीररित्या भाजले असल्याची दुर्घटना दिनांक ३० नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिलेंडर स्फोटाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सिलेंडर स्फोटामध्ये मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना तसेच आगीत भाजल्याने गंभीररित्या जखमी झालेल्यांना शासनाने मदत जाहीर केली आहे काय, एकूण किती आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे, सदरहू मदत केव्हा देण्यात आली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लालबाग येथील साराभाई इमारतीत सिलेंडराच्या स्फोटात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना तसेच आगीत भाजलेल्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) दिनांक ०६/१२/२०२० रोजी सकाळी अंदाजे ७.०० वाजताच्या दरम्यान डॉ.एस.एस.राव रोड, गणेश गल्ली, लालबाग, मुंबई ४०० ०१२ येथील साराभाई बिल्डिंगमध्ये, दुसऱ्या मजल्यावर गॅस सिलेंडर लिकेजमुळे आग लागून दुर्घटना घडली आहे. सदर दुर्घटनेत १० व्यक्तींचा मृत्यू झाला असून, ०८ व्यक्ती जखमी झाले होते. या प्रकरणी काळाचौकी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.२१९/२०२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर गुन्ह्यातील आरोपींना इमारतीमध्ये गॅस सिलेंडर ठेऊ नये, व्यवसाय करु नये तसेच गॅस गळती होत असून तो बंद करावा असे कळवून देखील गॅस सिलेंडर ठेऊन त्याचा स्फोट होण्यास कारणीभूत ठरले व स्वतः देखील जखमी झाले. यामधील एका आरोपीचा मृत्यू झाला असून एका आरोपीवर रुग्णालयात उपचार चालू आहेत. सदर दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष फक्त) व जखमी व्यक्तींना प्रत्येकी रुपये ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) याप्रमाणे मा.मुख्यमंत्री सहायता निधीतून अर्थसहाय्य

मंजूर झाले आहे. सदर दुर्घटनेतील १० मृत व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष फक्त) याप्रमाणे रुपये २०,००,०००/- (अक्षरी रुपये वीस लक्ष फक्त) व ०८ जखमी व्यक्तींना प्रत्येकी रुपये ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) याप्रमाणे रुपये ४,००,०००/- (अक्षरी रुपये चार लक्ष फक्त) असे एकूण रुपये २४,००,०००/- (अक्षरी रुपये चोवीस लक्ष फक्त) इतका निधी वाटप करण्याकरीता मा.मुख्यमंत्री सहायता निधीतून जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयास प्राप्त झाला आहे. त्यापैकी ०८ मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या वारसांना व ०६ जखमी व्यक्तींना मदत वाटप करण्यात आली आहे. मदत वाटप प्रलंबित असलेल्या उर्वरित ०२ मृत व्यक्तींपैकी १) मृत श्री.करीम, वय-४५ वर्षे हे बेवारस असल्याने त्यांना मदत देता आली नाही. तसेच २) मृत कु.सुशिला वासप्पा बंगेरा, वय-६२ वर्षे ह्या अविवाहीत होत्या. त्यांच्या वारसासंबंधी चौकशी केली असता त्यांचे आईवडील व भाऊ मृत झाले आहेत. त्यामुळे त्यांना मदत देता आली नाही. सदर दुर्घटनेतील मदत वाटप प्रलंबित असलेल्या उर्वरित ०२ जखमी व्यक्ती श्रीम. बिना अंबिका, वय-४५ वर्षे व श्री.हिमांशू कटीयार, वय-४४ वर्षे हे किरकोळ जखमी असल्यामुळे त्यांनी रुग्णालयात जाण्यास नकार दिला होता. त्यामुळे कार्यालयीन चौकशी पथकास त्यांचे जबाब/पंचनामे घेता आले नाहीत. त्यामुळे त्यांना मदत वाटप करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** | **श्री.राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** | **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.